सरकारी रोखे खरेदी संबंधाने दिलेले संपूर्ण चेकस् त्यांचे खात्यावर पुरेशी रक्कम नसल्या कारणाने परत आलेले आहेत. सदर कंपन्यांनी त्यांचे खात्यावर दिलेले चेकस् खात्यात रक्कम नसल्याकारणाने परत आल्यामुळे सर्व कंपन्याविरुध्द निगोशियबल इंस्टुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत फौजदारी दावे दाखल करण्यांत यावे. सदर फौजदारी दावे दाखल करण्याचे दृष्टीने आवश्यक सर्व कागदपत्रावर सह्या करण्याचे तसेच बँकेच्या वतीने साक्ष देण्यासंबंधीचे अधिकार बँकेचे प्रभारी व्यवस्थापक किंवा मुख्याधिकारी ह्यांना देण्यांत येत आहेत.

प्रशासकीय ठराव मंजुर.

---

विषय क्रमांक २: सेवा/विविध कार्यकारी सहकारी संस्थांना दिलेल्या कर्जापोटी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून रुपये ५५३.०० लाख फेर कर्ज मर्यादा मंजुरीबाबत व उचल देणेबाबत विनंती करणे.

ठराव क्रमांक २: राज्य सहकारी बँकेकडून आपल्या बँकेस अल्पमुदत शेती फेर कर्ज मर्यादा रुपये २२००.०० लाख वर्ष २००१-२००२ (दिनांक ३०।६।२००२ पर्यंत) करीता मंजुर आहे. बँकेनी सेवा/विविध कार्यकारी सहकारी संस्थांना मंजुर केलेल्या कर्ज वाटपापोटी दि.१७।६।२००२ पर्यंत रुपये २३००.०० लाखाचे वाटप केलेले आहे. या वाटपापैकी राज्य बँकेकडून दिनांक ७।६।2002 पर्यंत रुपये १६४७.०० लाखाच्या कर्जाची फेर उचल केलेली आहे उर्वरित फेर कर्ज उचली करिता (रुपये ५५३.०० लाखाच्या) प्रशासकीय ठराव घेवुन पाठवावा लागेल.

– प्रशासकीय ठराव –

बँकेनी सेवा/विविध कार्यकारी सहकारी संस्थांना मंजुर केलेल्या कर्जापोटी दिनांक १७।६।2002 पर्यंत रुपये २300.00 लाखाचे कर्ज वाटप केलेले आहे. त्यापोटी दिनांक ७।६।२००२ पर्यंत रुपये १६४७.०० लाखाची उचल केलेली आहे. उर्वरित रक्कम ५५३.०० लाखाच्या फेर कर्ज उचलीकरिता राज्य सहकारी बँकेला विनंती करण्यांत येत आहे.

राज्य सहकारी बँकेकडून मंजुर मर्यादेवर उचली घेणे संदर्भात कागदपत्रावर सह्या करण्याचे अधिकार मा. प्रशासक व प्रभारी व्यवस्थापक यांना दिनांक ६।५।२००२ ला प्रशासकीय ठराव क्रमांक ३ प्रमाणे संयुक्त रित्या देण्यांत आलेले आहे. राज्य सहकारी बँकेने घातलेल्या कर्ज मंजुरीच्या शर्ती व अटी बँकेला मान्य राहणार आहे.

ठराव मंजुर

विषय क्रमांक ३ : निर्मल अर्बन को-ऑप. बँक लि; नागपूर येथील कार्यकारी संचालक मा. श्री. एल. बी. पाटील यांना आपल्या बँकेचे प्रशासक म्हणून पाठविण्याबाबतच्या निर्मल अर्बन बँकेने कळविलेल्या अटी व शर्तीस मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ : मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश क्रमांक एफआयएन/एनडीसीसी बँक/2002 दिनांक ६ मे २००२ ला अनुसरुन निर्मल अर्बन को-ऑप. बँक लि; नागपूरने त्यांचे कार्यकारी संचालक मा. श्री. एल. बी. पाटील यांना आपल्या बँकेचे प्रशासक म्हणून परसेवेवर पाठविण्याबाबत त्यांचे पत्र क्र. एडीएम/एलबीपी. एमडी/६५२/२००२-२००३ दिनांक ६ मे २००२ नुसार कळविले आहे. सदर पत्रांत नमुद केलेल्या परसेवेच्या अटी व शर्तीस मान्यता देण्यांत येत आहे.

प्रशासकीय ठराव मंजुर

[signature] [signature]

प्रभारी व्यवस्थापक प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि; नागपूर

(5)

प्रशासकीय ठराव दिनांक २५/६/२००२

विषय क्रमांक १ : बचत ठेव खात्यावर वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट कर्ज मर्यादा नुतनीकरण मागणी अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक १ : वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट कर्ज मर्यादा योजने अंतर्गत ओव्हरड्राफ्ट कर्ज मर्यादा नुतनीकरणासाठी अर्ज आलेले आहेत. बँकेचे कर्ज धोरणानुसार सभासदांना रुपये १.०० लाखापर्यंत त्यांचे बचत ठेव खात्यावर एक वर्षाकरिता ओव्हरड्राफ्ट कर्ज मर्यादा मंजुर केल्या जातात व पुढे दरवर्षी सभासदाला मंजुर असलेल्या कर्ज मर्यादेचे नुतनीकरण केले जाते. तरी त्यानुसार खालीलप्रमाणे प्रशासकीय ठराव करण्यांत येत आहे.

- प्रशासकीय ठराव -

वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट कर्जमर्यादा योजने अंतर्गत यापूर्वी मंजुरी दिलेल्या कर्ज प्रकरणापैकी ओव्हरड्राफ्ट कर्ज

मर्यादांचे नुतनीकरण मंजुरीसाठी शाखांकडून प्राप्त झालेले एकुण ८१६ सभासदांचे रुपये ३६७५९८७०/- चे ओव्हरड्राफ्ट कर्ज मर्यादांना कार्यालयीन टिपणीनुसार पुढील एक वर्षाकरिता नुतनीकरणास मान्यता देण्यांत आली.

प्रशासकीय ठराव मंजूर

प्रभारी व्यवस्थापक — प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक लि. नागपूर.

(१८)

## प्रशासकीय ठराव दिनांक २६।६।२००२

**विषय क्रमांक १ :** नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुतगिरणी मर्या; हिंगणा यांना मशिनरी खरेदी करिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. मुंबई येथे एल.सी.ची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.

**ठराव क्रमांक १ :** नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुतगिरणी मर्या; हिंगणा यांना जर्मनी येथील डब्ल्यू स्ला फोस्ट ए.जी. अँड कंपनीकडून ऑटोकोनर ही आधुनिक मशिनरी खरेदी करावयाची असून त्याबाबत आवश्यक परवानगीचे कार्यवाहीसह सुत गिरणीचे संचालक मंडळाचे सभेत ठराव पारीत केलेला आहे व त्याप्रमाणे गिरणीने सदर कंपनीला मशिनरीची ऑर्डर दिलेली आहे. सदर मशिनरीची किंमत १११९५० युरो म्हणजे भारतीय चलनानुसार रुपये ६५.०० लाख असून ही रक्कम कंपनीला विदेशी चलनांत अदा करावयाची आहे. त्यासाठी सुतगिरणीने आपले बँकेमार्फत महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि; मुंबई येथे रुपये ६५.०० लाख लेटर ऑफ क्रेडीट (एल.सी.) सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केलेली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म. मुंबई येथील आय.बी.डी. विभागाने दिलेल्या माहितीनुसार मशिनरी खरेदीच्या किंमतीइतक्या रकमेचे एल.सी. खाते गिरणीच्या नांवाने उघडावे लागेल. याकरिता जिल्हा सहकारी बँकेला रुपये ६५.०० लाख रकमेची गॅरंटी द्यावी लागेल. तसेच मशिनरी पेमेंटचे वेळी आपले बँकेचे मुंबई येथील चालू ठेव खात्यातून रक्कम उपलब्ध करुन द्यावी लागेल.

गिरणीचे सदर मशिनरीचे खरेदीकरिता स्वनिधीतून रक्कम

केलेली आहे. तोपर्यंत तात्पुरती व्यवस्था म्हणून राज्य सहकारी बँकेला वेळीच पेमेंट करता यावे यासाठी गिरणीला मंजुर असलेल्या ताबे गहाण मर्यादेवर मशिनरीची एकुण किंमत रुपये ९५.०० लाख रकमेचे इयर मार्क करून ठेवावे लागेल.

गिरणीला चालु वर्षाकरिता ताबे गहाण मर्यादा रुपये ६००.०० लाख दिनांक ३१.३.२००३ पर्यंतचे मुदतीसाठी मंजुर असून या मर्यादे वर कर्ज बाकी नाही. संस्थेनी सर्व चार्जेससह मशिनरी खरेदी-पोटी होणारी एकुण रक्कम सुत गिरणीचे ताबेगहाण कर्ज खात्याला किंवा चालु ठेव खात्याला नांवे टाकुन वसुल करुन घेण्याबाबत दिनांक २४.६.२००२चे संचालक मंडळाचे सभेतील ठरावान्वये अधिकार दिलेले आहेत.

वरील सर्व बाबी विचारांत घेता नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुतगिरणी मर्या; हिंगणा यांना जिल्हा बँकेने महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म. मुंबई येथे एल.सी.खाते सुरु करुन देण्यासाठी हमी घेण्यांत यावी. तसेच सुत गिरणीची निकड लक्षांत घेता गिरणीला मंजुर असलेल्या ताबेगहाण मर्यादेमधून विदेशी मशिनरी खरेदीकरिता रुपये ९५.०० लाख तात्पुरती उचल मर्यादा गोठवून ठेवावी व सुत गिरणीची गरज भागवावी. याशिवाय सदर सुविधे-करिता राज्य सहकारी बँकेला आवश्यक असणारा ठराव पाठविणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रशासकीय ठराव करण्यांत येत आहे.

Resolved that:

1. The Nagpur Zilla Shetkari Sahakari Soot Girni Ltd., Hingna be issued a joint and several guarantee in favour of The Maharashtra State coop. Bank Ltd., Mumbai against the documentary credit to be issued by the letter for the rupees equivalent of 199,150 EURO (In words One lakh ninty nine thousand one hundred fifty EURO) at the rate of exchange applicable for retirement of bills there under:

2. The Maharashtra State coop. Bank Ltd, Mumbai is authorised to debit current Account No. 96/5751

of the Nagpur District Central Coop. Bank Ltd., with themselves by Rupee equivalent of the bill amount, charges and interest if any incurred under the documentary credit.

3. The following two persons are authourised to sign guarantee, Counter guarantee, status report on applicant and instructions for issue of the documentary credit.

| Sr.No. | Name | Designation |
|---|---|---|
| 1. | Shri L. B. Patil | Administrator |
| 2. | Shri S. S. Gode | Manager (Officg) |

4. Anyone of the following persons is authorised to countersign documents issued by the applicant for the credit.

| Sr.No. | Name | Designation |
|---|---|---|
| 1. | Shri L. B. Patil | Administrator |
| 2. | Shri S. S. Gode | Manager (Officg) |

Resolution Passed.

प्रभारी व्यवस्थापक                प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव बँक लि. नागपूर.

(7)

## Administrative Resolution Dated 21/06/2002

Subject: To apply to Government of India for grant of exemption from the provisions of Sections 11(1) of the Banking Regulation Act 1949 (As applicable to coop. societies.)

Resolution: Resolved that the Government of India be approached for grant of exemption to the bank from the provisions of sections 11(1) of the Banking Regulation Act 1949 (As applicable to cooperative societies) for a period of 3 years upto 2004-2005

As resolved to approve the attached time bound Action Plan prepared by the bank which will ensure implementation thereof with a view to securing compliance with the provisions of section 11(1) of the Act ibid by the end of 2004-2005. Further resolved that the Administrator of the bank be and is hereby authorised to take necessary Action and furnish necessary documents on behalf of the bank.

Resolution Passed

Manager (officting) Administrator

The Nagpur District Central Coop. Bank Ltd, Nagpur

## Administrative Resolution Dated 29/6/2002

**Subject:** Submission of Annual DAP/MOU for the year 2002-2003.

**Proposal:-** As instructed in the workshop for review of progress made by the bank as on 31st December 2001 as per the report of DLMRC, held on 10th May 2002 at The Maharashtra state Cooperative Bank Ltd., Regional Office, Nagpur, the annual targets for the year 2002-2003 are finalised and accordingly a purpose of DAP under MOU (in 5 copies) as per NABARD's Development Action Plan is required to be submitted for time bound implementation.

It is therefore proposed to adopt a suitable resolution by the bank which is as under:

- Administrative Resolution -

"Resolved that the Annual Memorandum of understanding for the year 2002-2003 be approved by the bank as per the draft of Annual MOU as discussed in the Administrative Meeting dated 29/6/2002.

Also resolved that the Time Bound development Action plan prepared by the bank be approved for implementation.

Further, resolved that the Administrator/Manager (offtg.) of the bank be authorised to sign the MOU and documents on behalf of the bank. and take necessary action"

Resolution Passed

Manager (officting) Administrator

The Nagpur District Central Coop. Bank Ltd, Nagpur.

(१५)

## प्रशासकीय ठराव दिनांक २/७/२००२

विषय क्रमांक १ : महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा १९६०-चे कलम ९१ अंतर्गत थकबाकीदारांकडील कर्जवसुलीसाठी न्यायालयांत दावा दाखल करणेबाबत.

ठराव क्रमांक १ : विषयाचे अनुषंगाने मा. प्रभारी व्यवस्थापक यांनी सांगितले की, खालिल लाभधारकांनी बँकेकडून कर्जावर रोड ट्रान्सपोर्ट योजने अंतर्गत वाहनं खरेदी केली आहेत. सदर लाभधारकांनी कर्जवसुली नियमित भरलेली नाही त्यामुळे त्यांना वारंवार सुचना देऊन, सुचना पत्रे पाठविण्यांत आली. परंतु त्यांनी त्याकडे अजिबात लक्ष दिले नाही. त्यामुळे त्यांची कर्जावर दिलेली वाहने जप्त करून लिलावाने विकण्यांत आली आहेत. लिलावाने विकून आलेली रक्कम त्यांचे कर्जखाती जमा करण्यांत आली आहे. त्यानंतरही त्यांचेकडे कर्जबाकी शिल्लक राहते.

| अ.क्र. | लाभधारकाचे नांव | खरेदी केलेले वाहन | कर्जरक्कम | कर्जबाकी रक्कम. |
|---|---|---|---|---|
| १. | श्री गोपाळ भाऊराव नरार | मिनिडोअर-२१.८.९८ | १२१६००/- | ९९७२७/- मु.<br>१२३०७/- व्या. |
| २. | श्री योगराज बळीराम मेश्राम | मिनिडोअर-२०.१.९७ | ११८३२०/- | ८५३९३/- मु.<br>४४७९/- व्या. |
| ३. | श्री. पांडुरंग सेवकराम आंबीलडुके | बजाज टेम्पो ॲक्सल<br>१०.१.२००० | ३६००००/- | २५२१९२/- मु.<br>१६२०५/- व्या. |
| ४. | श्री. राधेश्याम हिरांचद बरबटे | बजाज टेम्पो ॲक्सल<br>२२.२.२००० | ३१००००/- | १९७२१०/- मु. |

वरिलप्रमाणे कर्जदार सभासदांकडील थकित कर्जबाकी वसुल करणेसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा १९६०-चे कलम ९१ अंतर्गत सहकारी न्यायालयांत दावा दाखल करुन कर्जवसुलीची कार्यवाही करण्यांत यावी. कर्ज वसुलीकरिता सहकारी न्यायालयांत दावा दाखल करण्याचे व कागदपत्रावर सह्या करण्याचे अधिकार प्रभारी व्यवस्थापक / मुख्याधिकारी यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

प्रशासकीय ठराव मंजूर

[signature] ‍ ‍ [signature] लांबपाटील

प्रभारी व्यवस्थापक ‍ ‍ प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑप बँक लिमी, नागपूर.

# प्रशासकीय ठराव दिनांक ३/७/२००२

विषय क्रमांक १: बचत ठेव खात्यावर वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट कर्ज मर्यादा नुतनीकरण मागणी अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक १: वैयक्तीक ओव्हर ड्राफ्ट कर्ज मर्यादा योजनेअंतर्गत ओव्हरड्राफ्ट कर्ज मर्यादा नुतनीकरणासाठी अर्ज आलेले आहेत. बँकेचे कर्ज धोरणानुसार सभासदांना रुपये १.०० लाखापर्यंत त्यांचे बचत ठेव खात्यावर एक वर्षाकरिता ओव्हरड्राफ्ट कर्ज मर्यादा मंजुर केल्या जातात व पुढे दरवर्षी सभासदाला मंजुर असलेल्या कर्ज मर्यादेचे नुतनीकरण केले जाते. तरी त्यानुसार खालीलप्रमाणे प्रशासकीय ठराव करण्यांत येत आहे.

-प्रशासकीय ठराव-

वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट कर्ज मर्यादा योजनेअंतर्गत यापूर्वी मंजुरी दिलेल्या कर्ज प्रकरणांपैकी ओव्हरड्राफ्ट कर्ज मर्यादांचे नुतनीकरण मंजुरीसाठी शाखेकडून प्राप्त झालेले एकूण ६६१ सभासदांचे रुपये २७१६४३५०/- चे ओव्हरड्राफ्ट कर्ज मर्यादांना कार्यालयीन टिपणीनुसार पुढील एक वर्षाकरिता नुतनीकरणास मान्यता देण्यांत आली.

प्रशासकीय ठराव मंजुर.

---

विषय क्रमांक २: धंतोली शाखेच्या जुन्या जागेसंदर्भात घरमालक श्री.ए.के. मुखर्जी, ह्यांनी किराया व कारपोरेशन टॅक्सच्या वसुलीबाबत बँकेविरुध्द दाखल केलेल्या कोर्ट केसबाबत..

ठराव क्रमांक २: बँकेच्या धंतोली शाखेचे कार्यालय श्री. ए. के. मुखर्जी यांचे घरी होमगार्ड कार्यालयासमोर वस्त्या माळ्यावर किरायाने होते. सदर जागेबाबत किरायाचा करारनामा दिनांक १।९।१९९२ ला करण्यांत आला असून सदर करारनामानुसार ७२४ स्के.फुट जागा धंतोली शाखेकरिता किरायाने घेण्यांत आली होती. करारनाम्यानुसार त्या जागेचा मासीक किराया रुपये ३५००/- ठरविण्यांत येऊन त्या जागेचा कारपोरेशन टॅक्स व इलेक्ट्रिक-चार्जेस बँकेला भरायचे होते. सदर करारनाम्यातील अट क्र. १० नुसार बँकेला सदर जागा खाली करुन पाहिजे असल्यास घरमालकाला

तिन महिन्याचा आगाऊ नोटीस लेखी द्यावयाची अट होती. बँकेनी १९९४ मध्ये "नियोगी भवन" धंतोली येथे हिमालय बिल्डर्स ह्यांचे कडून जागा विकत घेतल्याने जुनी जागा रिकामी करून देण्याबाबत दिनांक १४।१०।९४ ला पत्र पाठवून सदर जागा दि.१।११।१९९४ पासून खाली करीत असल्याचे कळवून माहे ऑक्टोबर ९४-चा किराया दिला होता. करारनाम्यातील अटीनुसार बँकेनी तीन महिन्याची पुर्वसुचना न दिल्याने घरमालक श्री मुखर्जी ह्यांनी बँकेला तिन महिन्याचा किराया व कारपोरेशन टॅक्सची मागणी केली. त्याबाबत बँकेच्या तत्कालिन अध्यक्षांनी व श्री मुखर्जीह्यांचेत वाद झाल्याने सदर जागेमध्ये बँकेनी आपले कुलुप लावून ठेवले होते. तसेच सदर जागेत बँकेचे मोठे कांउटर, कॅश केबीन व कांही सामान होते. श्री मुखर्जी ह्यांनी त्यांना बँकेकडून किराया व टॅक्स मिळण्यासाठी बँकेविरुध्द सिव्हिल कोर्टात केस क्र.१०१/९६ दाखल केली. सदर केसमध्ये बँकेचे कुलुप व सामान असल्याने तसेच बँकेच्या साक्षिदारांच्या उलट तपासणीमध्ये कुलुप व सामान बँकेचे असल्याचे सिध्द झाल्याने कोर्टाने रूपये ६३२८७/-ची डिक्री पास केली. त्यानुसार बँकेनी दिनांक २९।२।९६ पर्यंतचा किराया कोर्टात जमा करुन त्याविरुध्द अपील क्रमांक ३५८/९९ केली. परंतु त्यांत स्टे मिळाला नाही.

श्री मुखर्जी ह्यांनी बँकेविरुध्द दिनांक १।३।९६ पासून ३०।६।१९९९ पर्यंतचा किराया मिळण्यासाठी पुन्हा सिव्हील कोर्टात केस क्रमांक २७७/९९ दाखल केली आहे. दिनांक १८।६।२००० ला श्री मुखर्जी ह्यांनी बँकेत प्रत्यक्ष येऊन त्यांचा दिनांक १।३।१९९६ पासुनचा किराया व कारपोरेशन टॅक्स हा नियमाप्रमाणे त्यांना मिळण्यांत यावा अशी विनंती केली.

सदर जागेबाबत बँकेचे कुलुप व सामान श्री मुखर्जी ह्यांचे घरी असल्याने सदर जागेबाबत किराया बँकेला भविष्यात द्यावा लागण्याची बाध्यता असल्याने तसेच बँकेस अकारण किरायाचा व टॅक्सचा बोझा दिवसेंदिवस वाढण्याची शक्यता असल्याने सदर केसमध्ये बँकेनी कोणती कार्यवाही करावी ह्याबाबत ॲड. भूषण धर्माधिकारी ह्यांचे कायदेशिर मत मागविण्यांत आले असता त्यांनी दिनांक २८।६।२००२ ला आपले मत बँकेला सादर करून सदर केसमध्ये कोर्टाने बँकेचा ताबा

असल्याचे आदेशांत नमुद केल्याने सदर केसमध्ये बँकेला तडजोड करुन प्रकरण निकाली काढणे योग्य होईल असा सल्ला दिला.

श्री मुखर्जी ह्यांना दिनांक ३।७।०२ ला चर्चेसाठी बोलाविले असतां त्यांना दिनांक १।३।९६ ते ३१।५।२००२ पर्यंतच्या एकूण ७६ महिन्याचा किराया रुपये ३५००/- महिन्याप्रमाणे रुपये २६६००० व त्यावरील १८ टक्के व्याजदराने व्याज रुपये ४७९९०/- व कारपोरेशन टॅक्स एप्रिल ९४ ते ३१।५।२००२ पर्यंत रुपये १७४६३६/- ची मागणी केली. त्यावर वाटाघाटी होऊन बँकेनी त्यांना न दिलेल्या १।३।९६ पासून ३१।५।२००२ पर्यंतचा किराया २६६०००/- देऊन सदर जागा खाली करुन घ्यावी. तसेच तेथे असलेले फर्निचर व केबीन दुसरीकडे उपयोगात आणावे व करारनाम्यातील अटीनुसार दिनांक ३१।३।02 पर्यंतचा कार्पोरेशन टॅक्स बँकेनी भरावा. श्री मुखर्जी ह्यांनी मागणी केलेल्या व्याजाची रक्कम त्यांना देण्यांत येवू नये. तसेच त्यांचेकडून जागेचा ताबा मिळाल्याचे लिहून घेतल्यानंतरच त्यांना किरायाची रक्कम देण्यांत यावी व कोर्टात सुरु असलेल्या केसेस मागे घेण्यांत याव्यांत, असे ठरले.

प्रशासकीय ठराव मंजूर.

---

प्रभारी व्यवस्थापक | प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

(२)

प्रशासकीय ठराव दिनांक ५।७।२००२

विषय क्र.१ : महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म. मुंबईकडून पगारदार सहकारी संस्थांना केलेल्या कर्ज पुरवठ्यापोटी बँकेस मंजूर झालेल्या रूपये २०००.०० लाख फेर कर्ज मर्यादा कर्ज मंजूर आदेशांतील अटी बँकेस मंजूर असल्याबाबत व त्यापोटी उचल मिळणेबाबत राज्य सहकारी बँकेस विनंती करणेबाबत.

ठराव क्र.१ बँकेने जिल्ह्यामधील पगारदार सहकारी संस्थांना केलेल्या कर्ज पुरवठ्यापोटी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे रूपये रू.९८ कोटी फेर कर्ज मर्यादेची मागणी करण्यांत आली होती. राज्य सहकारी बँकेचे कर्ज मंजुरी आदेश क्रमांक सीएफए/ओपीआर /फा.23/835/2002-03 दिनांक २।७।२००२ नुसार आपले बँकेस रूपये २०००.०० लाख फेर कर्ज मर्यादा दिनांक ३०।६।२००३ पर्यंतचे मुदतीसाठी द.सा.द.शे.१३ टक्के व्याजदराने मंजुर पत्रामधील अटी क्रमांक १ ते १२ अटीवर मंजुर केल्याचे कळविले आहे. नमुद केलेल्या अटी बँकेस मान्य असल्याबाबत व सदर मर्यादेवर उचल देणेबाबत प्रशासकीय ठराव घेऊन राज्य सहकारी बँकेकडे पाठवावा लागेल.

- प्रशासकीय ठराव -

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. मुंबई यांचे कर्ज मंजुरी आदेश क्रमांक सीएफए/ओपीआर/फा.23/835/2002-2003 दिनांक २।७।२००२ नुसार पगारदार सहकारी संस्थांना केलेल्या कर्ज पुरवठ्यापोटी मंजुर केलेल्या रूपये २०००.०० लाख फेरकर्ज मर्यादा, कर्ज मंजुर आदेशांतील राज्य सहकारी बँकेने घातलेल्या अटी बँकेस मान्य आहेत व त्यावर रूपये २०००.०० लाख उचल देणेबाबत प्रशासकीय ठरावाद्वारे राज्य सहकारी बँकेस विनंती करण्यांत येते. फेरकर्ज मर्यादेवर उचल करण्यासंबंधीचे आवश्यक कागदपत्रावर सह्या करण्याचे अधिकार मा. प्रशासक व प्रभारी व्यवस्थापक यांना संयुक्तरित्या राहील.

प्रशासकीय ठराव मंजुर.

(signature) (signature: लाबुपाटील)

प्रभारी व्यवस्थापक प्रशासक

✓ दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑप. बँक लि., नागपूर.

(१२)

## प्रशासकीय ठराव दिनांक ६।७।2002

विषय क्रमांक१ : शेती संस्थांना त्यांचे सभासद व्याज गाळा रकमेतून (उच्च मार्गाने) जॉईंट फंड भरण्याकरिता रक्कम वळती करणेबाबत.

ठराव क्रमांक१ : नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन कोऑपरेटीव्ह सोसायटी लि; नागपूर या संस्थेने ३५१ संस्थांचे सभासदाकडून वसूल झालेल्या सभासद व्याज गाळा रुपये १३४.७८ लाख रकमेची जॉईंट फंड भरण्याकरिता मागणी केल्याप्रमाणे बँकेनी दिनांक २०।५।2002 रोजी प्रशासकीय ठराव घेऊन रुपये १३.५० लाख माहे एप्रिल 2002-चा आणि दिनांक १०।६।०2 रोजी प्रशासकीय ठराव घेऊन रुपये १३.०० लाख माहे मे २००2-चे कर्मचाऱ्यांचे पगार व इतर खर्चाकरिता संस्थेचे जॉईंट फंड खात्याला वळती करण्यांत आली आहे. संस्थेने दिनांक २९।६।2002 रोजी पत्र देऊन उर्वरित सभासद व्याज गाळा रकमेतून माहे जून २००2-चा कर्मचाऱ्यांचा पगार करण्यास रक्कम उपलब्ध करून द्यावी अशी विनंती केली आइे. याकरिता खालील प्रमाणे प्रशासकीय ठराव घेण्यांत आला.

### - प्रशासकीय ठराव -

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन कोऑपरेटीव्ह सोसायटी लि; नागपूर या संस्थेने शेती संस्थांचे सभासदांकडून वसूल झालेल्या रकमेपैकी बँकेकडे असलेल्या प्रकरणांतील रुपये १०८.२८ लाख मधून व्याज गाळा माहे जुन २००2-चा संस्थेचे कर्मचाऱ्यांचा पगार करणेकरिता जॉईंट फंड खात्याला वळती करण्यास दिनांक २५।६।2002-चे पत्रा प्रमाणे विनंती केली आहे. गटसचिव हा कर्जवसुली व कर्जवाटप यांतील महत्वाचा घटक आहे, करिता गटसचिवांचे माहे जून 2002 चे पगार करण्याकरिता रुपये १३,६२,११८/-ची सभासद व्याज गाळा रक्कम जॉईंट फंड खात्यात वळती करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

प्रशासकीय ठराव मंजूर.

[signature] [signature]

प्रभारी व्यवस्थापक प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक लि, नागपूर.

श्री

## प्रशासकीय ठराव दिनांक १।७।२००२

विषय क्रमांक१ : हातमाग विणकर सहकारी संस्थांना सन २००१-०२ करिता मंजुर असलेल्या कर्ज मर्यादांना मुदतवाढ.

ठराव क्रमांक१ : हातमाग विणकर सहकारी संस्थांना सन २००१-२००२ करिता २५२ संस्थांना कर्ज मर्यादा मंजुर असून या मंजुर कर्ज मर्यादेची मुदत दिनांक ३१।३।२००२ला संपली आहे. त्यानंतर नुतनीकरण अर्जाअभावी बँकेनी संस्थांच्या कर्ज मर्यादांना प्रथम दिनांक १५।५।२००२ पर्यंत नंतर दिनांक ३०।६।२००२ पर्यंत दोनदा मुदतवाढ मंजुर केली. एकुण २५२ संस्थापैकी १०२ संस्थांनी बँकेकडे कर्ज नुतनीकरण अर्ज सादर केले आहेत. उर्वरित १५० संस्थांनी अजुनपर्यंत कर्ज नुतनीकरण अर्ज सादर केलेले नाहीत. विणकर प्रतिनिधींशी झालेल्या चर्चेनुसार त्यांनी अंतिम संधी म्हणुन सर्व २५२ संस्थांचे मंजुर कर्ज मर्यादांना मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे.

### -प्रशासकीय ठराव-

हातमाग विणकर सहकारी संस्थांना सन २००१-२००२ करिता २५२ संस्थांना मंजुर असलेल्या रुपये ३०८.४४ लाखांच्या कर्ज मर्यादांची मुदत दिनांक ३१।३।२००२ला संपली असल्याने तसेच सदर संपूर्ण संस्थांना यापूर्वी दिनांक १५।५।२००२व नंतर पुढे दिनांक ३०।६।२००२ पर्यंत दिलेली मुदतवाढ संपल्यामुळे कार्यालयीन टिपणीनुसार २५२ हातमाग विणकर सहकारी संस्थांचे रुपये ३०८.४४ लाखांचे कर्ज मर्यादेस दिनांक ३१।७।२००२ पर्यंत मुदतवाढ मंजुर करण्यांत आली. १५० संस्थांनी कर्ज नुतनीकरणाचे अर्ज सादर केलेले नसल्याने अशा संस्थांकडून मुदतीचे आंत अर्ज प्राप्त करुन घेण्यासाठी कर्ज विभाग मुख्य कार्यालय यांनी पाठपुरावा करावा.

प्रशासकीय ठराव मंजुर

(स्वाक्षरी) — प्रभारी व्यवस्थापक

लाल पाटील — प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑप. लि; नागपूर.

(२५)

## प्रशासकीय ठराव दिनांक १०/७/२००२

विषय क्रमांक १: ऊस कॅश क्रेडीट क.म. पत्रक मंजुरीबाबत

ठराव क्रमांक १: ऊस कॅश क्रेडीट कर्ज योजनेअंतर्गत श्रीराम सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील दिघोरी स्टेशन शाखेला संलग्न शिवणी सेवा सहकारी संस्थेच्या दोन सभासदांचे १० एकर ऊस खोडवा अंतर्गत पिक कर्ज मागणीकरिता रु.७०,०००/- ची क.म.पत्रके संस्था तसेच शाखेच्या शिफारशीसह निरिक्षकाचे स्थळ तपासणी अहवालासह मंजुरीस प्राप्त झाले. आवश्यक अटींची पूर्तता करण्यांत आल्यामुळे ऊस कॅश क्रेडीट (खोडवा) करिता दोन सभासदांना रु.७०,०००/- कर्ज मर्यादा मंजुरीकरिता सादर करित आहे.

- प्रशासकीय ठराव -

ऊस कॅश क्रेडीट कर्ज योजनेअंतर्गत ऊसाचे खोडवा पिकांकरिता दिघोरी स्टेशन शाखेला संलग्न शिवनी सेवा सहकारी संस्थेच्या दोन सभासदांच्या १० एकर ऊस खोडवा पिकाकरिता ऊस कॅश क्रेडीट मर्यादा रुपये ७०,०००/- ला कार्यालयीन शिफारशीनुसार मंजुरी देण्यांत आली.

प्रशासकीय ठराव मंजुर.

---

विषय क्रमांक २: बँकेची सन २००१-२००२ ची वार्षिक साधारण सभा घेण्यास मुदतवाढ मिळणेसाठी मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करणे.

ठराव क्रमांक २: महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० नुसार बँकेची वार्षिक साधारण सभा दरवर्षी १४ ऑगस्ट पूर्वी घेणे आवश्यक आहे. बँकेची सन २००१-२००२ ची वार्षिक साधारण सभा घ्यावयाची आहे. परंतु बँकेचे सरकारी रोखे गुंतवणुकी प्रकरणी चालु असलेली चौकशी व तपासणी तसेच यांत गुंतून असलेला स्टॉफ यामुळे बँकेची आर्थिक पत्रके मुदतीचे आंत पूर्ण होऊ शकली नाहीत. बँकेचे २००१-२००२ वर्षातील अंकेक्षण पूर्ण व्हायचे आहे. बँकेचे वार्षिक साधारण सभेची

करावी लागणारी पूर्वतयारी यासाठी लागणारा वेळ विचारांत घेता ही सभा घेण्यास बँकेला दि. १४/११/२०० पर्यंत मुदतवाढ मिळण्यासाठी मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांना विनंती करण्यांत यावी, असे ठरले.

प्रशासकीय ठराव मंजुर.

प्रभारी व्यवस्थापक

लावपाटील
प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑप. बँक लि. नागपूर

(२६)

## प्रशासकीय ठराव दिनांक १५।७।२००२

विषय क्रमांक १ : धरतवाडा सेवा सोसायटीचे सभासद श्री माधव केशवराव कुकडे यांची पिक कर्ज मर्यादा वाढविण्याबाबत.

ठराव क्रमांक १ : श्री माधव केशवराव कुकडे हे धरतवाडा सेवा सहकारी सोसायटीचे सभासद आहेत. सदर धरतवाडा सोसायटी बँकेचे रिधोरा शाखेला संलग्न आहे. सदर सभासदांकडे ५० एकर ओलीता खालील शेती आहे. सभासद नियमित कर्ज घेणारा व वसुली भरणारा आहे. बँकेचे कोरडवाहू व ओलीत मिळून प्रति शेतकरी सभासद जास्तीत जास्त रुपये १५००००/- पर्यंत पिक कर्ज मंजुर करण्याचे धोरण आहे. यांत ऊसासाठीच्या कर्जाचा समावेश नाही. सदर शेतकरी आधुनिक पध्दतीने शेती करणारा असून त्यांनी रुपये १५००००/- ची कर्ज मर्यादा कमी पडत असल्याने सदरची कर्ज मर्यादा वाढवून रुपये २०००००/- करण्याबाबत विनंती केली आहे. धरतवाडा सोसायटीने ठराव घेवुन सदर सभासदास रुपये २०००००/- पर्यंत कर्ज मर्यादा वाढविण्यास प्रस्ताव सादर केला आहे.

- प्रशासकीय ठराव -

बँकेचे रिधोरा शाखेला संलग्न असलेल्या धरतवाडा सेवा सोसायटीचे सभासद श्री माधव केशवराव कुकडे यांनी केलेल्या विनंती अर्जानुसार तसेच सेवा सोसायटीने केलेल्या शिफारशीनुसार सदर सभासद नियमित कर्ज फेडणारा असल्यामुळे बियाणे रासायनिक खते, औषधी, मजुरी इत्यादि करिता होणाऱ्या खर्चामध्ये होत असलेली वाढ विचारांत घेता तसेच सेवा सोसायटीची आर्थिक स्थिती सबळ असून वसुलीचे प्रमाण चांगले असल्याने फक्त श्री. माधव केशवराव कुकडे, सभासद, धरतवाडा सेवा सहकारी सोसायटी यांची पिक कर्जाची मर्यादा रुपये १५००००/- वरुन रुपये २०००००/- पर्यंत वाढविण्यास मंजुरी देण्यांत येत आहे. तसे रिधोरा शाखेला व धरतवाडा सेवा सहकारी सोसायटीला कळविण्यांत यावे.

प्रशासकीय ठराव मंजूर.

विषय क्रमांक २ : राष्ट्रीय बँक कायदा १९८१ कलम २८ चे तरतुदी-नुसार नाबार्ड दिर्घ मुदत फंडातून शासकीय भाग भांडवल रूपये ५.०० कोटी विशेष बाब म्हणून अर्थसहाय्य मिळणेबाबत

ठराव क्रमांक २: नाबार्ड तपासणी दिनांक ३१।३।२००१ अखेरच्या अहवा-लात बँकेनी दलालामार्फत शासकीय रोखे खरेदी केल्यामुळे व ते रोखे बँकेला प्राप्त न झाल्यामुळे बुडीत कर्जात वाढ तसेच वसुलीचे प्रमाण कमी ह्या सर्व कारणामुळे बँक आर्थिक अडचणीत येवून स्वनिधीच्या गोठवणुकीमुळे स्वनिधीचे मुल्य रूपये १.०० लाखापेक्षा कमी असल्याने बँकींग नियमन कायदा कलम ११(१)ची तरतुद बँकेला लागू झालेली आहे.

त्याकरिता बँकेनी बँकींग नियमन कायदा १९४९ चे कलम ११(१) अंतर्गत तरतुदीमधून सवलत मिळणेस्तव प्रस्ताव राष्ट्रीय बँकेने सुचित केलेल्या सन २००२-२००३ ते २००४-२००५ वर्षाच्या कृती आराखडयासह दिनांक २१।६।२००२ ला ५ प्रतीत महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि; मुंबई ला सादर केलेला आहे.

बँकेला ग्रामीण स्तरावर शेतकऱ्यांच्या पिक कर्ज, शेती उत्पादनाच्या व विकासाच्या योजना तसेच शासकीय विविध योजना राबविण्याकरिता कर्ज वितरण कार्यक्रमाकरिता बँकेला ठेवी व कर्जे स्वरूपांत उभाराव्या लागणाऱ्या निधीच्या अनुषंगाने राखावयाच्या "बाहेरील कर्ज उभारणी क्षमतेत" तुट पडत असल्याने दरवर्षी बाहेरील कर्ज उभारणी मर्यादेस मा० विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांची मान्यता घ्यावी लागते. नुकतेच दिनांक ३०।६।२००३ पर्यंतची मान्यता दिनांक ८।७।२००२ ला जा.क्र. विसनि /अर्थ-3/ जिमसबँक /नाग/ बाहे.कर्ज मर्यादा /७७६८/ २००२ नुसार आदेश मिळालेला असून छायाप्रत सोबत जोडलेली आहे.

बँकेच्या बाहेरील कर्जे उभारणी क्षमतेत तुट पडत असल्याने ती भरून काढण्यासाठी राष्ट्रीय बँक योजने अंतर्गत भाग भांडवल रूपाने आर्थिक सहाय्य शासनाकडून उपलब्ध होण्याकरिता नाबार्डने पुरस्कृत केलेल्या विहित नमुन्यांत 'प्रोफार्मा बी' Proforma B Loans to state Govts for Contribution to the share capital to Central Coop. Banks- भरून पाठवावा असे ठरले.

राष्ट्रीय बँकेच्या ह्या योजनेअंतर्गत शासनाकडून भाग भांडवल पोटी अर्थ सहाय्य उपलब्ध होण्यासाठी बँकेने दिनांक ३१/३/२००२ अखेर एकुण कर्जावरील एन.पी.ए.चे प्रमाण ३०टक्के पेक्षा कमी तसेच थकबाकीचे प्रमाण ६०टक्के पेक्षा कमी ह्या दोन्ही निकषांची पुर्तता केलेली आहे.

बँकेनी केंद्र शासनास राज्य बँकेमार्फत नाबार्ड, राज्य शासनास सादर केलेल्या कृती सुधार कार्यक्रमास मान्य केल्यानुसार कामकाजांत अपेक्षित सुधारणा घडवून आणण्याकरिता प्राधान्याने सदर कार्यक्रम राबवायचा आहे.

तरी बँकेची आर्थिक अडचण विचारांत घेवुन विशेष बाब म्हणून अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत महाराष्ट्र राज्य शासनास राष्ट्रीय बँकेच्या क्रेडीट डेव्हलोपमेंट दिर्घ मुदती फंडातून शासकीय भाग भांडवल रू.५.०० कोटी अर्थसहाय्य मिळणेस्तव प्रस्ताव सादर करावा असे ठरले.

तसेच या संबंधीचे कागदपत्रावर सह्या करण्याचे अधिकार बँकेचे मा. प्रशासक व प्रभारी व्यवस्थापक यांना देण्यांत येत आहेत असे ठरले.

प्रशासकीय ठराव मंजुर

---

[signature]
प्रभारी व्यवस्थापक

[signature]
प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑप.बँक लिमी.नागपूर.

# ADMINISTRATIVE RESOLUTION

DATED - 16|07|2002.

Subject : Approval of compliance report of the bank on the Inspection report received from NABARD, R.O. Pune, vide their letter No. NB/PN.DOS/496/A-17/2002-03 dated 24|4|2002.

Resolution : Resolved that the Inspection Report sent by the National Bank for Agriculture and Rural Development, Regional Office, Pune on the inspection carried out by them between 4.02.2002 and 26.02.2002 with particular reference to Bank's position as on 31-03-2001 covering financial years 1999-2000 and 2000-2001 has been received. Compliance report on rectification of the deficiencies pointed out in the report has been prepared. The said compliance report has been approved. It is further resolved to submit the same to NABARD. Regional office, Pune. Copy of the compliance report be sent to the commissioner for cooperation and Registrar, Cooperative societies, Maharashtra state, Pune and the Maharashtra State Cooperative Bank ltd, Mumbai. The resolution is passed.

Resolution passed

Manager (Officiating) Administrator

The Nagpur District Central Cooperative Bank ltd.

Nagpur.

## प्रशासकीय ठराव दिनांक २३।०७।२००२

विषय : बाबासाहेब आंबेडकर कोळसा खदान मागासवर्गीय कामगार सहकारी पत संस्था मर्या. सिल्लेवाडा या संस्थेने बँकेचे सभासदत्व मिळण्याकरिता केलेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव : बाबासाहेब आंबेडकर कोळसा खदान मागासवर्गीय कामगार सहकारी पत संस्था मर्यादित सिल्लेवाडा या संस्थेने बँकेचे सभासदत्व मिळण्याकरिता अर्ज केलेला आहे. सदर संस्थेची नोंदणी क्रमांक एनजीपी/एसएनआर/आरएसआर/सीआर/१०८३/२००१-2002/दिनांक ०४।०४।२००१ नुसार झाली आहे. सदर सहकारी पत संस्थेने सभासदत्वाकरिता बँकेचे खापरखेडा शाखेत दिनांक २२।०७।२००२ ला आवश्यक सभासद फी रूपये १०००/- व प्रवेश फी रूपये २/- असे एकूण रूपये १००२/- चा भरणा केलेला आहे. सदर सहकारी पत संस्थेची नोंदणी झाली असून दिनांक २२।०७।२००२ ला बँकेचे खापरखेडा शाखेत आवश्यक फी रूपये १००२/- चा भरणा केला असल्यामुळे बाबासाहेब आंबेडकर कोळसा खदान मागासवर्गीय कामगार सहकारी पत संस्था मर्यादित सिल्लेवाडा या पत संस्थेला बँकेचे सभासदत्व देण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

प्रशासकीय ठराव मंजूर

(सही) प्रभारी व्यवस्थापक
(सही) ल. बपारीले प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक लि. नागपूर.

## प्रशासकीय ठराव दिनांक २५.०७.२००२

विषय क्रमांक १ : सन २००२-२००३ वर्षाकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून अल्पमुदती शेती पीक कर्ज मर्यादा रुपये २२.००कोटी मंजुर करण्यांत आलेल्या मंजुरी पत्राप्रमाणे नियम व अटी स्विकृत करण्यास मान्यता देणे.

ठराव क्रमांक १ : सन २००२-२००३ वर्षाकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून अल्प मुदती शेती पीक कर्ज मर्यादा रुपये २२.००कोटी पत्र क्रमांक सीएफए/ओपीआर/एफ-२३/४२४/नागपूर/२००२-०३ दिनांक १/७/२००२ नुसार मंजुर झाली असून मंजुर मर्यादेनुसार उचल करण्याकरिता वरीलप्रमाणे मंजुरी दिलेल्या पत्रातील अटी व नियम मान्य असल्याबाबत बँकेचा ठराव पाठविण्यांत यावा असे कळविले आहे. सबब मंजुर मर्यादेनुसार उचल करण्याकरिता मंजुरी दिलेल्या पत्रातील अटी व नियम मान्य असल्याबाबत प्रशासकीय ठराव करावा लागेल.

### - RESOLUTION -

"Resolved that the terms and conditions laid down by the Maharashtra State Cooperative Bank Ltd [Incorporating the Vidarbha Cooperative Bank Ltd.] Mumbai vide letter No. CFA/OPR/F-23/424/Nagpur/2002-03, dated 1st July 2002 for the credit limit of Rs. 2200.00 lakhs [Rs. Two thousand two hundred lakhs only] sanctioned to this bank for financing seasonal Agricultural operation under pooled Rate scheme for the year 2002-2003 be and are hereby accepted, Further, resolved that anyone of the following bearers from Group "A" alongwith anyone ~~from~~ officer from Group "B" are hereby authorised to sign jointly the documents for the drawals of loan from the limit of Rs. 2200.00 lakhs only sanctioned for short term seasonal Agricultural credit limit for the year 2002-2003.

Further, resolved that anyone of the office bearers from Group 'A' alongwith anyone officer

from Group 'B' are hereby authorised to sign jointly the undertaking on behalf of the Nagpur District Central Cooperative Bank Ltd; Nagpur creating first charge on the pronotes of the Agricultural Credit societies and Act as custodian of the said pronotes on behalf of the Maharashtra state Cooperative Bank Ltd; [Incorporating the vidarbha Cooperative Bank Ltd] Mumbai and to endorse the said pronotes on behalf of this bank in favour of the Maharashtra state Cooperative Bank Ltd.] Mumbai as collateral security and to sign the monthly certificate of loan on behalf of this Bank.

1.) Administrator — Group-A

2) Manager (Officiating) — Group B'

Resolution passed

---

विषय क्रमांक २: व्यवसाय कर्ज योजनेअंतर्गत श्री राजेश रामदास टेंभुर-कर प्रोप्रा. ए.आर. इलेक्ट्रानिक्स, झिंगाबाई टाकळी, नागपूर. यांचे रुपये ६५०००/- कॅश क्रेडीट मर्यादा नुतनीकरण मागणी अर्जाबाबत.

ठराव क्रमांक २: व्यवसाय कर्ज योजनेअंतर्गत श्री राजेश रामदास टेंभुरकर प्रोप्रा. ए.आर. इलेक्ट्रानिक्स, झिंगाबाई टाकळी, नागपूर यांचे कॅश क्रेडीट मर्यादा नुतनीकरण मागणी अर्जावर निर्णय होऊन, अर्जदाराला व्यवसाया-करिता मंजुर असलेल्या रुपये ६५०००/- नजर गहाण कॅश क्रेडीट मर्यादेचे दिनांक ३१.०४.२००३ पर्यंतचे मुदतीसाठी नुतनीकरण खालील अटीवर कार्यालयीन टिपणीनुसार मंजुर करण्यांत आले.

अटी :- १) अर्जदाराकडून रु.६५००/- मुदत ठेव घेऊन कर्ज खात्यावर उचल द्यावी.

२) स्टाक मालावर ४०% मार्जीन राखून कर्ज व्यवहार हाताळावे.

प्रशासकीय ठराव मंजूर.

---

(signature)

प्रभारी व्यवस्थापक

(signature)

प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑप. बॅंक लि; नागपूर.

## प्रशासकीय ठराव दिनांक २८.०७.२००२

**विषय क्रमांक १:** एकत्रीत पगारमानावर नियुक्त केलेल्या शिपाई कर्मचाऱ्यांचा दिनांक २/७/२००२ ला कालावधी संपला असल्याबाबत.

**ठराव क्रमांक १:** मा. उच्च न्यायालयाचे याचीका क्रमांक. २३२८/९६ मधील अंतिम निर्णयाला आधिन राहून मुख्य कार्यालयाचे दिनांक २/१/२००२चे आदेशाप्रमाणे एकत्रीत पगारमानावर प्रति महिना रूपये १०५०/- प्रमाणे शिपाई म्हणून नियुक्त केलेल्या ५१ शिपाई कर्मचाऱ्यांचा सुरुवातीचा ६ महिन्याचा कालावधी दिनांक २/७/२००२ रोजी संपला आहे. सदर कर्मचाऱ्यांचे कार्यालयीन कामकाज व वर्तणुकीबाबत बोलाविलेले गोपनिय अहवाल अद्याप बँकेचे प्रशासन विभागास प्राप्त व्हायचे आहेत. सदर कर्मचाऱ्यांचे गोपनिय अहवाल प्राप्त व्हायचे असल्यामुळे आणि नियुक्तीचा कालावधी दिनांक १/७/२००२ रोजी संपल्यामुळे तुर्तास दिनांक २/१०/२००२ पर्यंत एकत्रीत पगारमानावरील कालावधी वाढविण्यांत येत आहे. या कालावधीत सदर कर्मचाऱ्यांचे गोपनिय अहवाल संबंधीत अधिकाऱ्याकडून त्वरित मागविण्यांत यावे असे ठरले.

प्रशासकीय ठराव मंजुर.

प्रभारी व्यवस्थापक — प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑप. बँक लि., नागपूर.

(४०)

## प्रशासकीय ठराव दिनांक २५/७/२००२

**विषय क्रमांक १:** मे. होम ट्रेड कंपनी लि, मे. सेंच्युरी डिलर्स प्रा. लि., मे. गिल्टेज मॅनेजमेंट सर्व्हीसेस लि; मे. इंद्रमणी मर्चंट्स प्रा. लि; व मे. सिंडीकेट मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा. लि; ह्यांचेकडून सरकारी रोखे घोटाळ्यामध्ये अडकलेल्या बँकेच्या रकमेच्या वसुलीसंबंधी यांचे विरुध्द दिवाणी न्यायालयांत वसुली दावे दाखल करण्याबाबत.

**ठराव क्रमांक १:** बँकेनी सरकारी घोटाळ्याचे बाबतील संबंधीत कंपनी किंवा दलाल यांचे विरुध्द दिवाणी दावे दाखल करण्यासाठी वकिलांशी सल्लामसलत केलेली होती. व ह्याबाबत आवश्यक कार्यवाही सुरु असतानाच सहकार खात्याकडून मा. सहकार आयुक्त व निबंधक ह्यांनी दिनांक २५/७/२००२ रोजी घोटाळ्यातील अडकलेल्या रकमेच्या वसुलीसाठी संबंधीत कंपनी किंवा दलाल यांचेकडून वसुलीसाठी न्यायालयामध्ये दिवाणी दावे १० दिवसांत दाखल करण्याचे निर्देश दिलेले आहेत. या अनुषंगाने संबंधीत कंपन्या १. मे. होम ट्रेड कं. लि; २. मे. सेंच्युरी डिलर्स प्रा. लि, ३. मे. गिल्टेज मॅनेजमेंट सर्व्हीसेस लि, ४. मे. इंद्रमणी मर्चंटस प्रा. लि, व ५. मे. सिंडीकेट मॅनेजमेंट प्रा. लि, ह्यांचे विरुध्द वसुली दावे दिवाणी न्यायालयांत त्वरित दाखल करण्यांत यावेत व तसा अहवाल मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचेकडे पाठविण्यांत यावा. दावे दाखल करण्यासंबंधीत केसवर, कागदपत्रावर, वकालतनाम्यावर सह्या करण्यास व इतर संबंधीत कार्यवाही करण्यास तसेच बँकेचे प्रतिनिधीत्व करण्यासंबंधीचे अधिकार बँकेचे प्रभारी व्यवस्थापक किंवा मुख्याधिकारी ह्यांना देण्यांत येत आहेत.

प्रशासकीय ठराव मंजुर.

---

**विषय क्रमांक २:** शेती संस्थांना त्यांचे सभासद व्याज गाळा रकमेतून (३% टक्के मार्जिन) जॉईंट फंड भरण्याकरिता रक्कम रुपये १४.४५ लाख वळती करणे बाबत.

**ठराव क्रमांक २:** नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन कोऑप. सोसायटी लि; नागपूर या संस्थेने ३५१ संस्थांचे सभासदांकडून वसुल झालेल्या सभासद व्याज गाळा रुपये १३४.७८ लाख रकमेतून

जॉईंट फंड भरण्याकरिता मागणी केल्याप्रमाणे खालिल प्रमाणे जॉईंट फंड खात्याला प्रशासकीय ठरावानुसार वळती केलेली आहे.

| प्रशासकीय ठरावाची तारीख | जॉईंट फंडाला वळती केलेली रक्कम | जॉईंट फंडाला वळती केल्याची तारीख. |
|---|---|---|
| २०.५.२००२ | रुपये १३.५० लाख | २२.५.२००२ |
| १०.६.२००२ | रुपये १३.०० लाख | १४.६.२००२ |
| ६.७.२००२ | रुपये १३.६३ लाख | ८.७.२००२ |
| | रुपये ४०.१३ लाख | |

संस्थेचे जॉईंट फंड खात्याला वरील प्रमाणे रुपये ४०.१३ लाख वळती केल्यानंतर रुपये ५४.६५ लाख बाकी आहे. संस्थेने दिनांक २२.७.२००२ रोजी पत्र देऊन उर्वरित सभासद व्याज गाळा रकमेतून माहे जुलै २००२ चा कर्मचाऱ्यांचा पगार करण्यास रक्कम उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती केली आहे. याकरिता खालिल प्रमाणे प्रशासकीय ठराव घेण्यांत आला.

प्रशासकीय ठराव -

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन कोऑप. सोसायटी लि. नागपूर या संस्थेनी शेती संस्थांचे सभासदांकडून वसुल झालेल्या रकमेपैकी बँकेकडे असलेल्या प्रकरणांतील रुपये ५४.६५ लाख मधून व्याज गाळा माहे जुलै २००२-चा संस्थेचे कर्मचाऱ्यांचा पगार करणेकरिता जॉईंट फंड खात्याला वळती करण्यास दिनांक २२।७।२००२-चे पत्राप्रमाणे विनंती केली आहे. गटसचिव हा कर्ज वसुली व कर्जवाटप यांतील महत्वाचा घटक आहे. करिता गटसचिवांचे माहे जुलै २००२-चे पगार करण्याकरिता रुपये - १४८५०००/- ची सभासद व्याज गाळा रक्कम जॉईंट फंड खात्याला वळती करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

प्रशासकीय ठराव मंजुर.

प्रभारी व्यवस्थापक

लोणपारखे
प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

(८१)

प्रशासकीय ठराव दिनांक ३०/०७/२००२

विषय क्रमांक १ : सौ. मिनाबाई संजय पुतारिया व जमानतदार यांचेवर महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा १९६० चे कलम ९१ अंतर्गत कर्जवसुली साठी न्यायालयांत दावा दाखल करणेबाबत.

ठराव क्रमांक १ : सौ. मिना संजय पुतारिया या लाभधारकाला बँकेकडून वैयक्तीक व्यवसायाकरिता वैयक्तीक कॅश क्रेडीट कर्ज रूपये १.५० लाख दिनांक ३१.३.२००१ पर्यंतचे मुदतीकरिता मंजुर केले होते. सदर लाभधारकांनी बरेच दिवसापासून खात्यावर व्यवहार केला नसून संपूर्ण कर्जबाकीची परतफेड न केल्याने तसेच सदर कर्ज मर्यादेचे नुतनीकरण न केल्यामुळे त्यांचे कर्जखाते दिनांक ३१/३/२००१ ला थकित झाले आहे. सभासदास बरेचदा पत्रव्यवहार केला व प्रत्यक्ष भेटी दिल्या. तसेच दुरध्वनीवरून संपर्क साधला व कर्जाची परत-फेड करण्याबाबत कळविले. परंतु याबाबत त्यांनी व त्यांचे जमानत-दारांनी अजिबात लक्ष दिले नाही.

| अ.क्र. | लाभधारकाचे नांव | शाखा | मंजुरमर्यादा | मुदत दिनांक | कर्जबाकी मार्च ०२ | कर्ज थकित झालेची तारिख |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सौ. मिनाबाई संजय पुतारिया | गणेशपेठ | रु. १.५० लाख | ३१-३-२००१ | रु. १.३२ लाख | ३१-३-२००१ |

वरील प्रमाणे कर्जदार सभासदांकडील थकित कर्जबाकी वसुल करणेसाठी सौ. मिना संजय पुतारिया आणि जमानतदार (१) श्री दयाविदेव खेमादेव भुरके रा. मु. पो. खानगांव ता. सावनेर जि. नागपूर (२) श्री प्रकाश चुडामनदेव भजन मु. पो. खानगांव ता. सावनेर जि. नागपूर यांचेवर महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा १९६० चे कलम ९१ अंतर्गत सहकारी न्यायालयांत दावा दाखल करून कर्ज वसुलीची कार्यवाही करण्यांत यावी. कर्ज वसुलीकरिता सहकारी न्यायालयांत दावा दाखल करण्याचे व कागदपत्रावर सह्या करण्याचे अधिकार प्रभारी व्यवस्थापक/मुख्याधिकारी यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

प्रशासकीय ठराव मंजुर.

विषय क्रमांक २ : श्री सुरेश बाळादेव भजन यांनी कर्ज वसुलीकरिता दिलेले चेक अनादर झाल्यामुळे (निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट

अॅक्ट कलम १३८ अंतर्गत ) न्यायालयांत दावा दाखल करणे बाबत.

ठराव क्रमांक२: सौ. मिनाबाई संजय पुलारिया यांचे थकित कर्ज वसुलीपोटी सहयोगी कंपनी कबीर कुलरचे प्रोपायटर श्री. सुरेश बाळादेव भजन यांनी नागपूर नागरीक सहकारी बँक लि; शाखा सक्करदरा येथील चालु डेव खात्यावरील खालील चेक बँकेला ~~बँ~~ दिले.

| चेक क्रमांक | दिनांक | बँकेचे नांव | रक्कम: |
|---|---|---|---|
| ०८९३५६ | २५.१२.०१ | नागपूर नागरीक स.बँक लि. शाखा सक्करदरा, नागपूर | १५०००/- |
| ३५७ | २०.०१.०२ | ,, | १५०००/- |
| ३५८ | २०.०२.०२ | ,, | १२०००/- |
| ३५९ | २५.०३.०२ | ,, | १५०००/- |
| ३६० | १०.०४.०२ | ,, | १५०००/- |
| ३६१ | २५.०४.०२ | ,, | १५०००/- |
| ३६२ | १०.०५.०२ | ,, | २३०००/- |
| ३६३ | २५.०५.०२ | ,, | २३०००/- |

सदरहू चेक वटविण्याकरिता बँकेत दिनांक ६।६।२००२ ला पाठविले असता खात्यांत पुरेशी रक्कम नसल्यामुळे (फंडस इनसफिशियन्ट) या कारणास्तव संपूर्ण चेक परत आलेले आहेत. लाभधारक व सहयोगी कंपनीचे (कबीर कुलर) प्रो.श्री सुरेश बाळादेव भजन यांना चेकची रक्कम १५दिवसाचे आंत भरण्याबाबत नोटीसद्वारे कळविले असून सभासदाने कांहीही रकमेचा भरणा केलेला नाही.

तरी सभासदांकडील थकित कर्ज वसुली करणेबाबत चेक देणारे श्री सुरेश बाळादेव भजन प्रो. कबीर कुलर यांचेवर निगोशियबल इन्स्ट्रुमेंट अॅक्ट कलम १३८ अंतर्गत न्यायालयांत दावा दाखल करण्यांत यावा. दावा दाखल करण्याचे कागदपत्रावर सह्या करण्याचे अधिकार प्रभारी व्यवस्थापक / मुख्याधिकारी यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

प्रशासकीय ठराव मंजुर.

विषय क्रमांक 3: श्री श्रीकांत मनोहरराव रोकडे, निलंबित लिपिक यांचे गैरवर्तणुकीबाबत प्राप्त झालेल्या चौकशी अहवालावर विचार करणे व निर्णय घेणे.

ठराव क्रमांक 3: श्री श्रीकांत मनोहरराव रोकडे हे बँकेच्या आस्थापनेत असून निलंबित लिपिक म्हणून सध्या बँकेचे प्रशासन विभाग, मुख्य कार्यालय, नागपूर येथे कार्यरत आहे. धंतोली शाखेत असतांना दिनांक २।१२।१९९९ ते दिनांक २१।१०।२००१ या कालावधीत शाखेतील २० खातेदारांच्या खात्यावर अनधिकृतपणे रकमा वाढविणे व त्या रकमा विथड्रावल करुन काढून घेणेचे व्यवहार करुन त्यांनी ह्या व्यवहारांत रुपये १३७०३६.९६-ची अफरातफर केल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आले. त्यामुळे त्यांना बँकेने दिनांक ११।२।२००२ अन्वये निलंबित करण्यांत आले. आणि दिनांक २।3।२००२-चे पत्रानुसार त्यांचे विरुध्द आरोप पत्र देऊन श्री. एल. आर. देशमुख यांची खाते चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यांत आली. खाते चौकशी पूर्ण करून श्री देशमुख यांनी बँकेकडे दिनांक २९।४।2002 ला सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार श्री रोकडे यांचेवरील संपूर्ण आरोप सिध्द झाले म्हणून सिध्द झालेल्या आरोपाकरिता त्यांचेवर बँकेच्या स्थायी आदेशांतील तरतुदीप्रमाणे पुढील कारवाई कां करण्यांत येवू नये ? या सबबीखाली दिनांक २3।५।२००२ ला अंतिम कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविण्यांत आला. यावर श्री. रोकडे यांनी दिलेल्या खुलाशांत अफरातफर केलेली रक्कम वडिलांचे घराच्या वस्था माळा विकून भरणार असल्याचे कबुल करुन याकरिता २ किंवा 3 महिन्याच्या अवधि मिळावा अशी विनंती केली आहे. परंतु आरोपाचे खंडण केलेले नाही.

श्री एल. आर. देशमुख, खाते चौकशी अधिकारी यांनी सादर केलेला चौकशी अहवाल व श्री रोकडे यांनी सादर केलेला खुलासा यावर विचार विनिमय होऊन श्री श्रीकांत मनोहरराव रोकडे यांनी अफरातफरीचा केलेला गुन्हा अक्षम्य आहे. त्यामुळे श्री श्रीकांत मनोहरराव रोकडे, निलंबित लिपिक, यांना बँकेचे नोकरीतून ह्या ठरावाचे तारखेपासून बडतर्फ (डीसमीस)

करण्यांत यावे. यांचे निलंबनाच्या कालावधी हा निलंबित काळ समजण्यांत यावा असे ठरले.

प्रशासकीय ठराव मंजुर

प्रभारी व्यवस्थापक

प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक लि. नागपूर

(३)

प्रशासकीय ठराव दिनांक ७।८।२००२

विषय क्रमांक ७: निवृत्तीवेतन धारकांसाठी वैयक्तिक कामाकरिता कर्ज मंजुरी बाबत आलेल्या कर्ज मागणी अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ७: ज्या निवृत्ती कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन आपले बँके-मार्फत अदा करण्यांत येते, त्या निवृत्तवेतनधारकांना त्यांचे निवृत्तीवेतनाची सहा महिण्याचे सरासरीचे सहा पट किंवा जास्तित जास्त रुपये ३०,०००/-पर्यंत त्यांचे वैयक्तिक कामाकरिता कर्ज मंजुर करण्यांत येते. तरी त्यानुसार खालिल प्रमाणे कर्ज प्रकरणाला मंजुरी देण्यांत आलि आहे. तरी त्यानुसार प्रशासकीय ठराव करण्यांत येत आहे.

-प्रशासकीय ठराव.

निवृत्तीवेतन धारकांसाठी त्यांचे वैयक्तीक कामाकरिता रामटेक शाखेमार्फत श्री नागोराव यादोबाव सायरे यांचा रुपये ३०,०००/-चा कर्ज मागणी अर्ज प्राप्त झाला. सभासदाने बँक कर्ज धोरणाप्रमाणे आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली असल्यामुळे सभासदांना कर्ज रुपये २०,०००/-फक्त २४ मासीक हप्त्यात व्याजासह वसुल करण्यासव कार्यालयीन शिफारशीनुसार नेहमीचे अटीवर कर्ज मंजुर करण्यांत आले.

प्रशासकीय ठराव मंजुर

प्रभारी व्यवस्थापक — प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव बँक लि; नागपूर.

33

# ADMINISTRATIVE RESOLUTION

DATED 02.08.2002.

Subject No. 1 : To approve of compliance of the report on the scrutiny of investment transactions received from Reserve Bank of India, Mumbai, vide their letter No. RPCD. R.F. 553/07.37.02/2001-2002 Dated 3 May 2002.

Resolution 1 : Resolved that the report sent by Reserve Bank of India, Mumbai on the scrutiny of investment transactions of the bank carried out by them under section 35 of the Banking Regulation Act. 1949, from 18th April 2002 to 23rd April 2002 of the investment transactions of the bank during 1st April 2000 to 31st March 2002 has been received. Compliance report on the rectification of the deficiencies pointed out in the report has been prepared. The said compliance report is hereby approved. It is further resolved to submit the compliance report to Reserve Bank of India, Mumbai. A copy of the compliance report may also be sent to the NABARD, Regional office, Pune.

Resolution is passed.

Manager (Officiating) Administrator

The Nagpur District Central Cooperative Bank Ltd Nagpur.

(५)

## प्रशासकीय ठराव दिनांक ३/८/२००२

**विषय क्रमांक १ :-** बँक कर्मचाऱ्यांकडून दुचाकी वाहन खरेदीसाठी आलेल्या कर्ज मागणी अर्जाबाबत.

**ठराव क्रमांक १ :** बँक कर्मचाऱ्याकडून दुचाकी वाहन खरेदीसाठी आलेल्या कर्ज मागणी अर्जावर निर्णय होऊन बँकेचे कर्ज धोरणाप्रमाणे बँक कर्मचाऱ्यांना वाहन खरेदीसाठी कार्यालयीन शिफारशीनुसार खालीलप्रमाणे कर्ज मंजुर करण्यांत आले.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | शाखा | मेक | मंजुर कर्जरक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | श्री डी.यु. सोनटक्के | मु.का. | बजाज स्पिरिट | २४६००/- |
| २. | " जी.ए. राऊत | बुटीबोरी | व्हिक्टोर | ४०५००/- |
| ३. | " ए.एन. मेश्राम | हनुमाननगर | कायनेटीक | ३६९००/- |

प्रशासकीय ठराव मंजुर.

---

**विषय क्रमांक २ :-** श्री जयदीप सुर्यकांत गडकरी, प्रो.प्रा. फाऊन्टन किंग इक्युपमेंट प्रा. लि. व जमानतदार यांचेवर महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा १९६०चे कलम ९१ अंतर्गत कर्ज वसुलीसाठी न्यायालयांत दावा दाखल करणेबाबत.

**ठराव क्रमांक २ :** श्री जयदीप सुर्यकांत गडकरी, प्रो.प्रा. फाऊन्टन पेन इक्युपमेंट प्रा. लि. पत्ता १७/६६ सांस्कृतीक संकुल २रा माळा, सिताबर्डी, नागपूर यांना खेळते भांडवलासाठी क्लिन कॅश क्रेडीट मर्यादा रुपये ८.००लाख दिनांक ३१/३/२००१ पर्यंत मुदतीसाठी मंजुर करण्यांत आली होती. सदर लाभधारकांनी बरेच दिवसांपासून खात्यावर व्यवहार केला नसून संपूर्ण कर्जबाकीची परतफेड न केल्याने तसेच सदर कर्ज मर्यादेचे नुतनिकरण न केल्यामुळे त्यांचे कर्ज खाते दिनांक १/४/२००१ पासून थकित झालेले आहे. कर्जदार सभासदास अनेकदा व्यक्तिशः सुचना देऊन तसेच पत्रव्यवहार करून कर्ज भरण्याबाबत कळविले. परंतु कर्जदाराने वेगवेगळी कारणे सांगून कर्ज खात्यावर कांहीही रक्कम भरलेली नाही.

| लाभधारकाचे नांव | शाखा | मंजुर मर्यादा | मुदत दिनांक | कर्जबाकी 30/6/02 | थकित झाल्याची तारिख |
|---|---|---|---|---|---|
| मे. फाऊन्टन किंग इक्वीपमेंटस् नागपूर प्रोप्रा. श्री जयदीप सुर्यकांत गडकरी | धंतोली | रु. ८.०० लाख. | ३१/३/२००१ | ८,५८,८६३/- | १/४/२००१ |

वरिलप्रमाणे कर्जदार सभासदांकडील थकित कर्जबाकी वसुल करणेसाठी श्री जयदीप सुर्यकांत गडकरी आणि जमानतदार १) श्री सुर्यकांत रामचंद्र गडकरी, राहणार प्लॉट नं. ३५, खानखोजे नगर, मानेवाडा रोड, नागपूर २) सौ. मंगेशा जयदीप गडकरी, राहणार, ७९, स्वावलंबी नगर, नागपूर यांचेवर महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा १९६०च्या कलम ९१ अंतर्गत सहकारी न्यायालयांत दावा दाखल करुन कर्ज वसुलीची कार्यवाही करण्यांत यावी. कर्ज वसुलीकरिता सहकारी न्यायालयांत दावा दाखल करण्याचे व कागदपत्रावर सह्या करण्याचे अधिकार प्रभारी व्यवस्थापक किंवा मुख्याधिकारी यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

प्रशासकीय ठराव मंजुर

विषय क्रमांक ३ : हातमाग विणकर सहकारी संस्थांना गत वर्षासाठी मंजुर असलेल्या पत मर्यादांचे सन २००२-२००३ करीता नुतनीकरण मंजुरीचे धोरण ठरविणे बाबत.

ठराव क्रमांक ३ : प्राथमिक हातमाग विणकर सहकारी संस्थांना उत्पादन व विक्री व्यवहारासाठी करावयाच्या कर्ज पुरवठ्या संदर्भात नाबार्डचे राष्ट्रीय धोरण दरवर्षी प्रस्तुत करण्यांत येते. सन २००२-२००३ साठी कर्ज पुरवठ्या संदर्भात नाबार्डचे धोरण अद्याप प्राप्त झालेले नाही.

सन २००१-२००२ ह्या मागील वर्षाकरिता पत मर्यादा नुतनीकरण मंजुर असलेल्या ७५२ हातमाग विणकर संस्थांचे पत मर्यादांची मुदत दिनांक ३१।३।२००२ ला संपल्यामुळे सन २००२-२००३ ह्या वर्षासाठी पतमर्यादा नुतनीकरणासाठी मागणी होत आहे. कांही संस्थांनी मागील वर्षापेक्षा जास्त रकमेची मागणी केलेली आहे. त्यामुळे सदर संस्थांचे पत मर्यादांचे सन २००२-०३ करिता नुतनीकरण मंजुर करणेसाठी राष्ट्रीय बँकेने मागील वर्षासाठी प्रस्तुत केलेल्या दिनांक २० मार्च २००१ चे पत्र जा.क्र. एन.बी./पीसीडी/ओपीआर/एच ७६६/ए-७(पी)/२०००-२००१ धोरणाचा आधार घेऊन खालील प्रमाणे धोरण ठरविण्यांत येत आहे.

१] प्राथमिक हातमाग विणकर संस्थांना पत मर्यादा मंजुरीचा

पात्रतेचे निकष

अ) संस्था उत्पादन आणि विक्रीचे व्यवहार करीत असली पाहिजे.

ब) संस्था कार्यक्षम असावी किंवा कार्यक्षम होण्याइतपत सक्षम असावी व रेकार्ड लिहिण्यासाठी व्यवस्थापकाची नियुक्ती केली असावी.

क) संस्थेचे नक्त विनियोगक्षम भांडवल मंजूर मर्यादेचे प्रमाणांत उपलब्ध म्हणजेच संस्थेचे एन. डी. आर. सकारात्मक (Positive) असावे.

ड) संस्थेचे एक वर्षापेक्षा जास्त कालावधीचे अंकेक्षण होणे शिल्लक नसावे.

ई) संस्थेचा ऑडिट वर्ग 'अ' 'ब' किंवा 'क' असावा.

२) हातमाग विणकर संस्थांना खेळते भांडवल मंजुरीचे निकष.

खेळते भांडवलाची गरज अजमावतांना संस्थेनी गत वर्षात प्रत्यक्षांत केलेले उत्पादन किंवा गत तीन वर्षातिल सरासरी अधिकतर उत्पादन यांतील फायदेशिर उत्पादन आंकडेवारी विचारांत घेऊन व त्यात २०टक्के वाढ गृहीत धरून या प्रमाणे अपेक्षित उत्पादनाच्या ५०टक्के खेळते भांडवल मंजुर करता येईल.

३) नव्याने स्थापन झालेल्या किंवा बंद संस्था कार्यान्वित करण्यासाठी कर्ज पुरवठ्याबाबत.

नव्याने स्थापन झालेल्या संस्था अथवा बंद असलेल्या संस्था कार्यान्वित करण्यासाठी तसेच कार्यरत असलेल्या संस्थांना नविन माग खरेदी करून बसविण्यासाठी वा बंद माग सुरु करण्यासाठी अशा संस्थांना खेळते भांडवलाची गरज ठरवितांना राज्यस्तरीय स्थायी समितीने केलेली शिफारस व नाबार्डने निश्चित केलेल्या प्रती माग कर्ज दर विचारांत घेऊन कर्ज पुरवठा उपलब्ध करून देता येईल. तथापी अशा संस्थांच्या बाबतीत पुढील बाबींचा विचार होणे आवश्यक राहील.

अ) नविन किंवा कार्यान्वित केलेले माग हे संचालक, हातमाग यंत्रमाग व वस्त्रोद्योग यांनी प्रमाणीत केलेले असावे.

ब) वरील प्रकारच्या संस्थांच्या किंवा नविन मागाच्या बाबतीत खेळते भांडवल हे सुरुवातीच्या २ वर्षाकरिता प्रती माग कर्ज दरानुसार उपलब्ध होईल. मात्र त्यापुढील कालावधीकरिता सामान्य संस्थांना ज्या पद्धतीने अपेक्षित उत्पादनाच्या प्रमाणांत मर्यादा मंजुर करण्यांत येतात. त्याचप्रमाणे या संस्थांना सुध्दा मर्यादा मंजुर करता येईल.

क) बँकेनी विशेष कार्यक्रमाअंतर्गत अथवा नविन संस्थांना कर्जपुरवठा केल्यास, या संस्था कर्जाचा योग्य प्रकारे उपयोग करतात किंवा नाही यासाठी लाभार्थी संस्थेला दरमहा साठामाल पत्रके सादर करावे लागतील. तसेच आवश्यक साठामाल तपासणीसाठी संस्थेला आवश्यक कागदपत्रे व साठामाल उपलब्ध करून द्यावा लागेल.

३) तसेच सामान्य आणि विशेष कार्यक्रमा अंतर्गत होणाऱ्या उत्पादनाचे स्वतंत्र खाते (Accounts) संस्थेने ठेवावयास पाहिजे. त्याचप्रमाणे विशेष कार्यक्रमा अंतर्गत होणारा उत्पादन हे सामान्य कार्यक्रमाअंतर्गत होणाऱ्या उत्पादनांत एकत्रीत न करता स्वतंत्ररित्या ठेवला पाहिजे व यासाठी स्वतंत्र रेकार्ड कार्यालयांत ठेवावा लागेल.

४) मागील वर्षाच्या पत मर्यादेच्या नुतनीकरणा संदर्भात.

अ) गतवर्षी इतपत कर्ज मर्यादांचे नुतनीकरणाबाबत विणकर संस्थेनी विक्रीच्या किमान ५० टक्के वा मंजुर मर्यादेच्या किमान ६० टक्के रक्कम कर्जखाती भरणा केलेला असावा.

ब) वरीलप्रमाणे संस्थेनी कर्जखाती भरणा न केल्यास अथवा कमी भरणा केल्यास त्या प्रमाणांत मर्यादा कमी करण्यांत येईल.

क) कर्जखाती विक्रीच्या किमान ३० टक्के वा मंजुरमर्यादेच्या किमान ४० टक्के भरणा करू न शकणाऱ्या संस्था ह्या थकबाकीदार समजण्यांत येतील. अथवा अशा संस्था कर्जास पात्र ठरणार नाही.

५) वाढीव कर्ज मर्यादा मंजुरीबाबत

वाढीव पत मर्यादा मंजुरी संदर्भात संस्थेनी विक्रीच्या किमान ६० टक्के किंवा मंजुर मर्यादेच्या किमान ७५ टक्के यांतील जादा रकमेपर्यंत भरणा झालेला असावा.

६) अतिरिक्त कर्ज मर्यादा मंजुरीबाबत.

मंदीच्या काळांत संस्थेच्या उत्पादीत मालाची विक्री होऊ न शकल्याने तयार मालाचा साठा तुंबुन पडून राहत असल्यामुळे अशा स्थितीत संस्थांना उत्पादन कार्य सुरू ठेवण्यासाठी मंजुर मर्यादा अपूरी पडत असल्यास

खालील बाबी विचारांत घेऊन अतिरिक्त मर्यादा मंजुर करता येवू शकेल.

अ) संस्थेचे गत वर्षाच्या अपेक्षित उत्पादनाच्या किमान ८०टक्के पर्यंत प्रत्यक्ष उत्पादन झालेले असावे.

ब) विक्रीच्या किमान ६०टक्के वा मंजूर मर्यादेच्या ७५टक्के यांतील जादा रकमेपर्यंत भरणा झालेला असावा.

क) मंजुर असलेली मर्यादा आणि अतिरिक्त मर्यादेची एकूण बेरीज ही चालु वर्षातील अपेक्षित उत्पादनाच्या ७५टक्के पेक्षा जास्त नसावी.

ड) अतिरिक्त कर्ज मर्यादेची परतफेड ६ महिन्यांत करावी लागेल.

ई) अतिरिक्त मंजुर केलेली पत मर्यादा आणि नियमित मंजुर असलेली मर्यादेची बेरीज ही संस्थेच्या एन.डी.आर.च्या ९ पटी पेक्षा जास्त नसावी.

७) मार्जीन (दुरावा)

अ) संस्थेच्या नक्त विनियोगक्षम भांडवलाच्या प्रमाणांत बँकेनी खेळते भांडवलासाठी मंजुर केलेल्या मर्यादेच्या १०टक्के मार्जीन (दुरावा) संस्थेनी राखावयास पाहिजे.

ब) संस्थेचे नक्त विनियोगक्षम भांडवल ठरवितांना संस्थेचे एकूण स्वनिधी आणि ठेवी उणे शासकीय आणि इतर विश्वस्त यांचे प्रतिभुती मध्ये गुंतवणुक, सहकारी संस्थांच्या हिश्यांत गुंतवणुक, स्थावर मालमत्ता, साज-सज्जा (सजावट) आणि संचित तोटा असल्यास विचारांत घेतल्या जाईल.

क) प्राथमिक हातमाग विणकर संस्था अपेक्षित उत्पादनाच्या आधारे अथवा प्रती माग कर्ज दरानुसार अधिक मर्यादेसाठी जरी पात्र ठरत असले तरी मंजुर मर्यादा ही संस्थेच्या नक्त विनियोगक्षम भांडवलाच्या ९ पटीच्या मर्यादेच्या आंत असावा.

८) व्याज वसुलीची पध्दत

याशिवाय हातमाग विणकर संस्थांकडील व्याज वसुली बाबत आकारणी केलेले मागील सहामाहिचे व्याज वसुल करून नुतनीकरण करण्याची प्रचलित पध्दती या वर्षी सुध्दा अंमलात राहील.

वरील प्रमाणे ठरविण्यांत आलेल्या धोरणास

प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. तथापी नाबार्डचे सन २००२-२००३ साठीचे कर्जपुरवठ्या संदर्भात धोरण प्राप्त झाल्यानंतर त्यांतील सुचना विचारांत घेवुन आवश्यक वाटल्यास सध्याचे धोरणांत बदल करण्यांत येईल असेही ठरले.

प्रशासकीय ठराव मंजुर

विषय क्रमांक ४ :- श्री अजय नानाजी पांडे, निलंबीत लिपीक, ह्यांचे गैरवर्तणुकीबाबत प्राप्त झालेल्या खाते-चौकशी अहवालावर विचार करणे व निर्णय घेणे.

ठराव क्रमांक ४ : श्री अजय नानाजी पांडे हे बँकेच्या आस्थापनेत असून निलंबीत लिपीक म्हणून सध्या बँकेचे शाखा मांढळ येथे कार्यरत आहेत. मांढळ शाखेत असतांना दिनांक २८।७।१९९९ ते दिनांक ८।११।२००० या कालावधीत त्यांनी विद्युत बिलाच्या भरणा करणाऱ्या ग्राहकांकडून स्विकारलेल्या बिलापोटी रुपये १३९६३१/-ची अफरातफर केल्याचे प्राथमिक चौकशी अहवालावरुन निदर्शनास आले. त्यामुळे मुख्य कार्यालय आदेश क्रमांक-प्रशासन/निलंबीत/ए.एन.पी/२०००-२००१/५७५६ दिनांक २५.११.२००० अन्वये त्यांना निलंबीत करण्यांत आले व त्यांनी केलेल्या गैरकृत्याबाबत मुख्य कार्यालय पत्र क्रमांक प्रशासन/आरोपपत्र/ए.एनपी/२०००-०१/६७८५ दिनांक ७।१२।२००० अन्वये आरोप पत्र देऊन खाते चौकशीचे आदेश देण्यांत आले.व या प्रकरणी चौकशी अधिकारी म्हणून श्री.व्ही.एस.धाराशिवकर यांची नियुक्ती करण्यांत आली.

याशिवाय त्यांनी वीज बिल ग्राहकांना, बिलांची रक्कम स्विकारुन बँकेचा कॅश रिसिव्हड्चा स्टँप मारुन पावत्या दिलेल्या आहेत. अशा ग्राहकांच्या वीज बिलांची रक्कम रुपये १५३२६०/-असल्याचे ग्राहकांनी बँकेकडे सादर केलेल्या पावत्यावरुन निदर्शनास आले. यावरुन श्री पांडे यांनी विज बिलापोटी ग्राहकांकडून स्विकारलेल्या रकमेची बुध्दिपुरस्सर अफरातफर केली हे स्पष्ट असल्याने त्यांना मुख्य कार्यालय पत्र क्रमांक प्रशासन/आरोप पत्र/एएनपी/ २००१-०२/५१०३ दिनांक २७/३०।१०।२००१ अन्वये पुनश्च आरोप पत्र देण्यांत आले. व खाते चौकशी करणेसाठी श्री धाराशिवकर यांची नियुक्ती करण्यांत आली.

चौकशी अधिकारी श्री धाराशिवकर यांनी सदर प्रकरणी रितसर खाते चौकशी पूर्ण करून अहवाल दिनांक २४।५।२००२ व दि. २०।६।२००२ ला बँकेकडे सादर केले आहेत. सदर चौकशी अहवालानुसार त्यांचेवर लावलेले संपूर्ण आरोप पूर्णपणे सिद्ध झाले आहेत. याकरिता त्यांना दोषी ठरवून सिद्ध झालेल्या आरोपा करिता बँकेच्या स्थायी आदेशानुसार कार्यवाही कां करण्यांत येवू नये? या सबबीखाली दिनांक १८/२४।६।२००२ व ६।७।२००२ ला अंतिम कारणे दाखवा नोटीसेस देवुन खुलासा मागविण्यांत आला. यावर त्यांनी सादर केलेल्या खुलाशांत खाते चौकशी अहवाल त्यांना अमान्य असल्याचे म्हटले आहे. आरोप पत्रामध्ये नमुद केलेल्या रकमेची भरपाई मासिक पगारातून करून देण्याची हमी देवुन त्यांना, अपंगत्वाची व वृध्द आईवडिलांच्या जबाबदारीची बाब पुढे करून कामावर रुजू करून घेण्याची व याप्रकरणी कोणतीही कारवाई न करण्याबाबत विनंती केली आहे.

या प्रकरणी दोन्ही खाते चौकशी अहवाल व श्री पांडे यांनी सादर केलेला खुलासा यावर विचार विनिमय करणेत येवून श्री अजय नानाजी पांडे यांनी रुपये २१२८९१/- रकमेची अफरातफर करून केलेला गुन्हा अक्षम्य आहे. सामुळे श्री अजय नानाजी पांडे, निलंबीत लिपीक, शाखा मांढळ यांना बँकेच्या नोकरीतून तात्काळ बडतर्फ करण्यांत यावे, असे ठरले. त्यांचा निलंबनाचा कालावधी निलंबन काळ म्हणून समजण्यांत यावा असेही ठरले.

प्रशासकीय ठराव मंजुर

---

विषय क्रमांक ५: हातमाग विणकर सहकारी संस्थांना सन २००१-२००२ करिता मंजुर असलेल्या कर्ज मर्यादांना मुदतवाढ देणेबाबत.

ठराव क्रमांक ५: बँकेमार्फत २५२ हातमाग विणकर सहकारी संस्थांना सन २००१-२००२ करिता रुपये ३०६.४४ लक्षाच्या पत मर्यादा मंजुर असून या पत मर्यादांची मुदत दिनांक ३१।३।२००२ ला संपली आहे. या २५२ हातमाग विणकर सहकारी संस्थापैकी बऱ्याच संस्थांकडून सन २००२-२००३ करिता कर्ज नुतनीकरणासाठी अर्ज प्राप्त न झाल्याने या सर्व संस्थांना प्रथम दिनांक १५।५।२००२ पर्यंत व नंतर दिनांक ३०।६।२००२ पर्यंत मुदतवाढ मंजुर करण्यांत आली.

या कालावधीतही १५० हातमाग विणकर संस्थाकडून नुतनी-करणाचे अर्ज बँकेला प्राप्त न झाल्याने व उर्वरित संस्थांचे कर्ज नुतनीकरणाची प्रक्रिया पूर्ण व्हावयाची असल्यामुळे त्यांचे कर्ज व्यवहारांत अडथळा निर्माण होउ नये म्हणून पुनश्च या सर्व संस्थांना दिनांक ३०।६।२००२ पर्यंत मुदतवाढ मंजुर करण्यांत आली. दरम्यानच्या कालावधीत १४९ संस्थांनी सन २००२-२००३ करिता नुतनीकरणासाठी अर्ज सादर केलेले असून उर्वरित १०३ संस्थांचे अजुनही अर्ज प्राप्त झालेले नाहीत. कर्जनुतनी-करण अर्ज सादर करणे संबंधात या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची बँक निरिक्षकांनी प्रत्यक्षांत भेट घेउन नुतनीकरणाचे अर्ज त्वरित सादर करण्याबाबत कळविले आहे. तथापी संस्थांची आर्थिक पत्रके तयार झालेली नसल्यामुळे संस्थांकडून अर्ज सादर करण्यांत आलेले नाहीत. या संबंधात विणकर प्रतिनिधीं नी मा० प्रशासक यांचेशी चर्चा करुन सर्व संस्थांना पुन्हा मुदतवाढ देणेबाबत विनंती केली आहे.

- प्रशासकीय ठराव -

२५२ हातमाग विणकर सहकारी संस्थांना सन २००१-२००२ करिता मंजुर असलेल्या पत मर्यादांना दिलेली मुदतवाढ दिनांक ३१।६।२००२ ला संपलेली असून १०३ संस्थांचे कर्ज नुतनीकरणाचे अर्ज बँकेला प्राप्त झालेले नाहीत. केवळ १४९ संस्थांनी नुतनीकरणासाठी अर्ज सादर केले आहेत. परंतु सदर संस्थांचे पत मर्यादा नुतनीकरणाची प्रक्रिया पूर्ण व्हायची असल्याने १०३ संस्थांना अर्ज सादर करण्यास पुन्हा संधी उपलब्ध व्हावी व या संस्थांचे कर्ज व्यवहार सुरळीत सुरु रहावे म्हणून पुनश्च या सर्व संस्थांना दिनांक ३१।८।२००२ पर्यंत मुदतवाढ मंजुर करण्यांत येते. तथापी सन २००२-०३ करिता कर्ज नुतनीकरणासाठी अर्ज सादर करणाऱ्या संस्था-नाच कर्ज खात्यावर व्यवहार करता येईल.

प्रशासकीय ठराव मंजुर.

---

(सही) प्रभारी व्यवस्थापक

(सही) प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑप. बँक लि., नागपूर.

ॐ

## प्रशासकीय ठराव दिनांक ५।८।2002

विषय क्रमांक १ :- बँकेच्या जीप गाड्यांच्या खाजगी वापराचे वाढीव दरास मान्यता देणे, तसेच इतर सुधारीत नियमांना मंजुरी देणे.

ठराव क्रमांक १ : दिनांक ४।२।१९९१ रोजीचे मा. संचालक मंडळाचे सभेत बँकेच्या जीप गाड्यांच्या खाजगी वापराचे डिझेल जीप/गाडी कार रुपये १.०० प्रती किलो मिटर आणि पेट्रोल कार रुपये १.५० प्रती किलो मिटर प्रमाणे ठरविण्यांत आले होते.

वरील प्रमाणे असलेले दर हे कालबाह्य झाले असून सन १९९१ चे तुलनेत डिझेल व पेट्रोलच्या किंमतीत भरमसाठ वाढ झालेली आहे तसेच मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (अधिकोष), नागपूर यांनी बँकेचे वाहनाच्या खाजगी वापराचे दरांत वाढ करण्याबाबत सुचना केल्या आहेत. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ यांनी केलेल्या सुचना तसेच डिझेल व पेट्रोलचे किंमतील झालेली वाढ विचारांत घेता बँकेच्या जीप गाड्यांच्या खाजगी वापराचे दरांत ठरावाचे तारखेपासून खालील प्रमाणे वाढ करण्यांत यावी, असे ठरले.

१. डिझेल जीप गाडी/कार - रुपये १.०० प्रती किलो मिटर वरून रुपये 3.०० प्रती किलो मिटर.

२. पेट्रोल कार - रुपये १.५० प्रति किलो मिटर वरून रुपये ४.५० प्रति किलो मिटर.

वरील प्रमाणे ठरविण्यांत आलेले वाढीव दरास मान्यता देण्यांत आली व यापूर्वी दिनांक ४।२।१९९१ चे मा. संचालक मंडळाचे सभेत मंजुर करण्यांत आलेल्या नियमांत दुरुस्ती करण्यांत येवून खालील प्रमाणे सुधारीत नियमांना मंजुरी देण्यांत आली.

बँकेच्या वाहनाच्या खाजगी वापरासंबंधी नियम -

१. वाहनांसाठी कमीत कमी ४ दिवस अगोदर अर्ज करणे आवश्यक राहील. एकाच दिवसाकरिता एकापेक्षा जास्त अर्ज असल्यास ज्यांचा अर्ज अगोदर येईल त्यांना प्राधान्य देण्यांत येईल.

२. बँकेच्या कामांत व्यत्यय न येता वाहन उपलब्ध करून देण्यासारखे असेल तरच ते खाजगी कामाकरिता देण्यांत येईल.

3. वाहनांचा खाजगी वापरांचा दर पेट्रोल कार रुपये ४.५० प्रती किलो मिटर व डिझेल कार जीप/कार रुपये 3.०० प्रती किलो मिटर प्रमाणे राहील. लागणारे डिझेल/पेट्रोल व ऑईल आणि दुरुस्तीचा

खर्च बँक करील.

४. महिन्यातून एकदा वाहन जास्तीत जास्त ३ दिवस कालावधी-करिता खाजगी कामासाठी उपलब्ध होऊ शकेल.

५. वाहन ठरलेल्या दिवशी व ठरलेल्या वेळेत बँकेस परत करणे आवश्यक राहील.

६. वाहन खाजगी उपयोगासाठी वापरतांना ते वाहन बँकेचे ड्रायव्हरच्याच ताब्यांत राहील. या काळांत इतर ड्रायव्हरचा उपयोग करता येणार नाही.

७. प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी ठरविलेल्या क्षमतेपेक्षा गाडीत अधिक ओझे अथवा प्रवासी नेता येणार नाही.

८. प्रवास संपता क्षणीच लॉगबुकावर सही करावी.

९. खाजगी कामासाठी वापरलेल्या गाडीसंबंधी देण्यांत येणारे बील मिळताच ७ दिवसाचे आंत त्याप्रमाणे पैसे जमा करावे.

प्रशासकीय ठराव मंजूर

(सही) (सही)

(एस. एस. गोडे) (एल. बी. पाटील)

प्रभारी व्यवस्थापक प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमि. नागपूर

३८

## प्रशासकीय ठराव दिनांक ७।८।२००२

**विषय क्रमांक १ :-** बलुतेदार ग्रामीण कारागिर सहकारी संस्थांचे कंम्पोझिट कर्ज मागणी अर्जबाबत.

**ठराव क्रमांक १ :** महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाकडून जिल्ह्यातील ग्रामीण कारागिरांच्या बलुतेदार सहकारी संस्थांच्या ३८४ सभासदांची रुपये १२२.८० लाखाची कर्ज प्रकरणे प्राप्त झाली आहेत. सहकार खात्याकडून ग्रामीण कारागिर बलुतेदार सहकारी संस्थांचे सभासदांकरिता रुपये १००.०० लाख कर्ज मंजुरीचे उद्दीष्ठ बँकेला दिलेले आहे.

वरीलप्रमाणे खादी ग्रामोद्योग मंडळाचे शिफारसीसह बलुतेदार संस्थांच्या बँकेला प्राप्त झालेल्या कंपोझिट कर्ज मागणी प्रकरणावर निर्णय होऊन खालीलप्रमाणे १२ बलुतेदार संस्थांच्या ३८४ सभासदांना रुपये १२२.८० लाखाचे कंम्पोझिट कर्ज मंजुर करण्यात आले.

(रुपये लाखांत)

| अ.क्र. | बलुतेदार संस्थेचे नांव | विशेष घटक योजने अंतर्गत सभासद | विशेष घटक योजने अंतर्गत मार्जिन कर्ज | विशेष घटक योजने अंतर्गत खेळते भांडवल | विशेष घटक योजने अंतर्गत एकूण | सामान्य कारागिर सभासद | सामान्य कारागिर मार्जिन कर्ज | सामान्य कारागिर खेळते भांडवल | सामान्य कारागिर एकूण | एकूण सभासद | एकूण मार्जिन कर्ज | एकूण खेळते भांडवल | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागपूर बलुतेदार | ५ | ०.२५ | ०.६५ | ०.९० | १६ | २.३० | ३.८० | ६.१० | २१ | २.५५ | ४.४५ | ७.०० |
| २ | कामठी " | ७ | १.४५ | १.४५ | २.९० | ११ | १.८० | २.६० | ४.४० | १८ | ३.२५ | ४.०५ | ७.३० |
| ३. | हिंगणा " | ९ | ०.६० | ३.०० | ३.६० | ५ | ०.४० | १.७५ | २.१५ | १४ | १.०० | ४.७५ | ५.७५ |
| ४. | कळमेश्वर " | २४ | ३.७५ | २.७५ | ६.५० | ५४ | ९.३६ | ६.०४ | १५.४० | ७८ | १३.११ | ८.७९ | २१.९० |
| ५. | काटोल " | १२ | १.८८ | १.४४ | ३.३२ | १३ | २.४० | १.४५ | ३.८५ | २५ | ४.२८ | २.८९ | ७.१७ |
| ६. | नरखेड " | २४ | ०.४२ | १.१२ | १.५४ | — | — | — | — | २४ | ०.४२ | १.१२ | १.५४ |
| ७. | रामटेक " | ३६ | ०.८८ | ३.७५ | ४.२३ | १७ | १.४० | २.८८ | ४.३५ | ५३ | १.१५ | ६.६३ | ८.५६ |
| ८. | पारशिवनी " | १७ | ४.१५ | ५.३५ | ९.५० | ३४ | ७.८८ | ११.४० | १९.०८ | ५१ | ११.६३ | १६.७५ | २८.५८ |
| ९. | उमरेड " | १३ | ०.९० | ०.७५ | १.६५ | १६ | १.६५ | १.६५ | ३.३० | २९ | १.५५ | २.४० | ६.०५ |
| १०. | भिवापूर " | २० | २.६९ | ४.६६ | ७.३५ | ४५ | ६.०५ | ९.०० | १५.०५ | ६५ | ८.७४ | १३.६६ | २२.४० |
| ११. | कुही " | ९ | १.०५ | २.८० | ३.८५ | — | — | — | — | ९ | १.०५ | २.८० | ३.८५ |
| १२. | मौदा " | — | — | — | — | ७ | १.१७ | १.४८ | २.६५ | ७ | १.१७ | १.४८ | २.६५ |
| | एकूण | १७६ | १७.८० | २६.८८ | ४४.४८ | २०८ | ३८.२६ | ४३.०४ | ७८.३३ | ३८४ | ४९.९१ | ७०.५२ | १२२.८० |

वरीलप्रमाणे १२ बलुतेदार सहकारी संस्थांच्या ३८४ सभासदांना रुपये १२२.८० लाख कंपोजीट कर्ज बँकेचे धोरणानुसार व कार्यालयीन शिफारसीनुसार मंजुर करण्यात आले असून त्यानुसार प्रशासकीय ठराव मंजूर करण्यात आला.

प्रशासकीय ठराव मंजूर

प्रभारी व्यवस्थापक | प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि; नागपूर.

(८)

## प्रशासकीय ठराव दिनांक १२.०८.२००२

**विषय क्रमांक १ :** नागपूर जिल्हा नुतन दुध उत्पादक सहकारी संघ मर्या. नागपूरचे रुपये ७५.०० लाख कॅश क्रेडीट मर्यादा नुतनिकरण मागणी अर्जाबाबत.

**ठराव क्रमांक १ :** नागपूर जिल्हा नुतन दुध उत्पादक सहकारी संघ मर्या. नागपूरचे कॅश क्रेडीट मर्यादा नुतनीकरण मागणी अर्जावर निर्णय होऊन, संघाला शासकीय दुध योजनेकडून मिळाव-याचे बिलापोटी बुक-डेट फॅसिलिटी अंतर्गत मागील वर्षा-साठी मंजुर असलेल्या रुपये ७५.०० लाख कॅश क्रेडीट (बुक-डेट) मर्यादांचे दिनांक ३१/०७/२००३ अखेर पर्यंतचे मुदतीसाठी कार्यालयाने शिफारसीनुसार नुतनिकरण खालील अटीवर मंजुर करण्यांत आले.

अटी :-

१) बॅंक हिस्से रुपये ६७५००/-चे खरेदी करावी लागेल.

२) शिल्लक बचत फंडाची रक्कम बॅंकेत गुंतवावी लागेल.

प्रशासकीय ठराव मंजुर

---

| | |
|---|---|
| (एस.एस. गोडे) | (एल. बी. पाटील) |
| प्रभारी व्यवस्थापक | प्रशासक |

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बॅंक मर्या. नागपूर

३४

प्रशासकीय ठराव दिनांक १७।८।२००२

विषय क्रमांक १ : बँकेचे सन २०००-२००१ या वर्षीचे शासकीय अंकेक्षण अहवाल चे पूर्तता अहवालास मान्यता देणे.

ठराव क्रमांक १ : मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (अधिकोष) नागपूर यांनी बँकेचे सन २०००-२००१ वर्षीचे अंकेक्षण पूर्ण करून बँकेला सादर केलेल्या अंकेक्षण अहवालातील त्रुटींची पूर्तता व दुरूस्ती करून कार्यालयाने तयार केलेल्या अंकेक्षण पूर्तता अहवालास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर अंकेक्षण पूर्तता अहवाल बँकेचे विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (अधिकोष), नागपूर यांचेकडे पाठविण्यांत यावा असे ठरले.

वरिलप्रमाणे ठराव मान्य.

(एस.एस. गोडे) (एल. बी. पाटील)
प्रभारी व्यवस्थापक प्रशासक
दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक मर्या, नागपूर.

३५

प्रशासकीय ठराव दिनांक २६.०८.२००२

विषय क्रमांक १ : श्री दिलीप नामदेवराव ठाकरे, ड्रायव्हर यांचा प्रोबेशनरी कालावधी संपल्यामुळे बँकेचे नोकरीत कायम करणेबाबत विचार करणे.

ठरावक्रमांक १ : श्री दिलीप नामदेवराव ठाकरे, ड्रायव्हर यांचा दिनांक ८.१२.२००१ रोजीचे मा. सेवक उपसमितीचे सभेतील ठराव क्रमांक ५ नुसार एक वर्षाचा प्रोबेशन कालावधी दिनांक १४.७.२००२ रोजी संपला आहे. त्यामुळे श्री दिलीप नामदेवराव ठाकरे यांचा पुनश्च प्रोबेशन कालावधी दिनांक १४.१.२००३ पर्यंत वाढविण्यांत येत आहे, असे ठरले.

प्रशासकीय ठराव मंजुर.

प्रभारी व्यवस्थापक प्रशासक
दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑप. बँक मर्या. नागपूर.

(40)

## प्रशासकीय ठराव दिनांक २७।८।२००२

विषय क्रमांक १ : शेती संस्थांना त्यांचे सभासद व्याज गाळा रकमेतून (३ टक्के मार्जीन) जॉइन्ट फंड भरण्याकरिता रक्कम रुपये१३६४११८।- वळती करण्याबाबत

ठराव क्रमांक १ : नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन कोऑप.सोसायटी लि, नागपूर या संस्थेने ३५८ संस्थांचे सभासदांकडून वसुल झालेल्या सभासद व्याज गाळा रुपये १३८.७८ लाख रकमेतून जाइंट फंड भरण्याकरिता मागणी केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे जाइंट फंड खात्याला प्रशासकीय ठरावानुसार वळती केलेली आहे.

| प्रशासकीय ठरावाची तारीख | जॉइंट फंडात वळती केलेली तारीख | रक्कम (रुपये लाखांत) |
|---|---|---|
| २०.५.२००२ | २२.५.२००२ | १३.५० |
| १०.६.२००२ | १४.६.२००२ | १३.०० |
| ६.७.२००२ | ६.७.२००२ | १३.६३ |
| २६.७.२००२ | १.८.२००२ | १४.८५ |
| एकुण | | ५४.५८ |

संस्थेचे जाइंट फंड खात्याला वरीलप्रमाणे रुपये ५४.५८ लाख वळती केल्यानंतर रुपये ८०.२० लाख बाकी आहे. संस्थेने दिनांक २३.८.२००२ रोजी पत्र देऊन उर्वरित सभासद व्याज गाळा रकमेतून माहे ऑगष्ट २००२ च्या कर्मचाऱ्यांच्या पगार करण्यास रक्कम उपलब्ध करून द्यावी अशी विनंती केली आहे. याकरिता खालीलप्रमाणे प्रशासकीय ठराव घेण्यात आला.

### प्रशासकीय ठराव.

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन कोऑपरेटीव्ह सोसायटी लि, नागपूर या संस्थेनी शेती संस्थांचे सभासदांकडून वसुल आलेल्या रकमेपैकी बँकेकडे असलेल्या प्रकरणांतील रुपये ८०.२० लाख मधून व्याज गाळा माहे ऑगष्ट २००२ च्या संस्थेचे कर्मचाऱ्यांच्या पगार करणेकरिता जॉइन्ट फंड खात्याला वळती करण्यास दिनांक २३.८.२००२ चे पत्राप्रमाणे विनंती केली आहे. गटसचिव हा कर्ज वसुली व कर्ज वाटप यांतील महत्वाचा घटक आहे. करिता गटसचिवांचे माहे ऑगष्ट २००२चे

पगार करण्याकरिता रुपये १३६४११८.००ची सभासद व्याज गाळा रक्कम जॉईंट फंड खाली वळती करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

प्रशासकीय ठराव मंजुर

---

विषय क्रमांक २ : श्री श्रीकांत मनोहरराव रोकडे (बडतर्फ) लिपीक यांचे विरुध्द त्यांनी धंतोली शाखेत कार्यरत असतांना अफरातफर केलेल्या रकमेची वसुली करण्याकरिता मा० सहकार न्यायालयांत कलम ९१ अंतर्गत वसुली दावा दाखल करणे.

ठराव क्रमांक २ : श्री श्रीकांत मनोहरराव रोकडे हे बँकेच्या आस्थापनेत धंतोली शाखेत लिपीक म्हणून दिनांक २.१०.१९९१ ते २१.१०.२००१ या काळापर्यंत कार्यरत असतांना त्यांनी शाखेतील एकुण २० खातेदारांच्या खात्यावर एकुण रुपये १३७०३६७.९९ ची अफरातफर केली असल्याचे खाते चौकशीमध्ये सिध्द झाले. त्यांचे विरुध्द केलेल्या खाते चौकशीमध्ये त्यांचेवर लावण्यांत आलेले संपूर्ण आरोप सिध्द झाल्याने बँकेनी त्यांना दिनांक ३०/७/२००२ कामावरुन बडतर्फ केले. श्री श्रीकांत रोकडे यांनी खाते चौकशीत त्यांनी सदर रकमेची अफरातफर केल्याचे मान्य करुन त्यांनी केलेल्या अफरातफरीच्या रकमेपैकी रुपये २.०० लाखाचा भरणा बँकेत केला. व त्याचे वडिलांनी त्यांचे धंतोली लोकमत चौक, नागपूर येथील फ्लॅट क्रमांक १३-१ पहिला माळा, विजय अपार्टमेन्टस या घराची पॉवर ऑफ ॲटर्नी बँकेला करुन दिलेली आहे. श्री रोकडे यांनी धंतोली शाखेत कार्यरत असतांना केलेल्या रुपये १३७०३६७.९९ च्या अफरातफरीसाठी श्री रोकडे हे सर्वस्वी जबाबदार असल्याने तसेच त्यांनी त्यापैकी रुपये २.०० लाखाचा भरणा बँकेत केल्याने उर्वरित रकमेच्या व्याजासह वसुली करणेकरिता त्यांचे विरुध्द मा० सहकारी न्यायालय, नागपूर येथे कलम ९१ अंतर्गत लवाद दावा दाखल करण्यांत यावा तसेच त्यांचे वडिलांनी सदर रकमेचा भरणा करण्यासाठी बँकेला दिलेल्या स्थावर मालमत्तेवर अॅटॅचमेंट बिफोर अवार्ड घेण्याची कार्यवाही करण्यांत यावी. या बाबत आवश्यक कागदपत्रांवर, वकालतनाम्यावर सह्या करण्याचे अधिकार बँकेच्या प्रभारी व्यवस्थापक किंवा मुख्याधिकारी यांना देण्यांत येत आहेत.

प्रशासकीय ठराव मंजुर

---

विषय क्रमांक ३ : श्री अजय नानाजी पांडे (बडतर्फ) लिपीक यांचे विरुद्ध अफरातफर केलेल्या रकमेची वसुली करण्याकरिता मा. सहकार न्यायालयांत कलम ९१ अंतर्गत वसुली दावा दाखल करणे.

ठराव क्रमांक ३ : श्री अजय नानाजी पांडे हे बँकेच्या आस्थापनेत मांढळ शाखेत दिनांक २७.९.१९९९ ते ८.११.२००० या कालावधीत कार्यरत असतांना यांचेकडे कॅशियरचे काम सोपविण्यांत आले होते. सदर कालावधीत विद्युत बिलाचा भरणा करणाऱ्या ग्राहकांकडून बिलांची रक्कम स्विकारुन त्यांनी त्यांना रक्कम मिळाल्याबाबत बँकेचे स्टँपस व स्वाक्षरी करुन बिले दिली. परंतु सदर रक्कम डे बुक व डीसीसीआर मध्ये घेतली नाही. अशाप्रकारे ग्राहकाकडून विद्युत बिलापोटी स्विकारलेली रक्कम बँकेच्या हिशेबांत न घेता एकूण ४९४ विद्युत बिलापोटी रुपये ३०८०५०/- रकमेचा अपहार करुन अफरातफर केली. त्यांचे विरुद्ध केलेल्या विभागीय खाते चौकशीमध्ये सदर रकमेच्या अफरातफरीबाबत ते संपूर्णपणे दोषी आढळल्याने बँकेनी त्यांना दिनांक ५.८.२००२ ला नोकरीतून बडतर्फ केले आहे.

श्री अजय पांडे यांनी बँकेच्या मांढळ शाखेत विद्युत बीलापोटी स्विकारलेल्या रुपये ३०८०५०/- ची अफरातफर केल्यामुळे त्यांचे विरुद्ध सदर अफरातफरीच्या रकमेची व्याजासह वसुली करण्याकरिता मा. सहकारी न्यायालय, नागपूर येथे कलम ९१ अंतर्गत लवाद दावा दाखल करण्यांत यावा. याबाबत आवश्यक कागदपत्रावर, वकालतनाम्यावर सह्या करण्याचे अधिकार बँकेच्या प्रभारी व्यवस्थापक किंवा मुख्याधिकारी यांना देण्यांत येत आहे.

प्रशासकीय ठराव मंजुर

विषय क्रमांक ४ : शिपाई श्रेणीत पुर्ववत घेणेबाबत श्री अरुण वासुदेवराव डोंगरे यांचे विनंती अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ४ : श्री अरुण वासुदेवराव डोंगरे यांना शिपाई श्रेणीतून ड्रायव्हर कम शिपाई म्हणून दिल्यानंतर ड्रायव्हर कम शिपाई श्रेणीत कार्यरत असतांना त्यांना अपघात झाला व या अपघातानंतर श्री अरुण वासुदेवराव डोंगरे हे वैद्यकिय अहवालानुसार ड्रायव्हरची ड्युटी करु शकत नाहीत.

तसेच त्यांनी शिपाई श्रेणीत पुर्ववत घेणेबाबत बँकेकडे दिनांक २५.७.२००२ रोजी विनंती अर्ज केला आहे. वैद्यकिय अहवालानुसार श्री डोंगरे ड्रायव्हरची ड्युटी करु शकत नसल्यामुळे श्री डोंगरे यांचा विनंती अर्ज विचारांत घेउन त्यांना शिपाई श्रेणीत पुर्ववत घेण्यात यावे. आणि त्यांना शिपाई श्रेणीतील पगारमान देण्यांत यावे असे ठराले.

प्रशासकीय ठराव मंजूर

विषय क्रमांक ५: शाखांनी ठेवावयाची रोख मर्यादा निश्चित करणे.

ठराव क्रमांक ५: यापूर्वी बँकेच्या रुपये ५६५५.७६ कोटींच्या ठेवी असतांना दिनांक ३१.८.२००१ रोजी एकुण ठेवीच्या आधारावर शाखांनी ठेवावयाची रोख मर्यादा रुपये १६.६७ कोटींची निश्चित करण्यांत आली होती. दिनांक २६.६.२००२ रोजी बँकेकडे रुपये ५५५६.४० कोटींच्या ठेवी आहेत. बँकींग रेग्युलेशन ॲक्ट कलम १८ नुसार ठेवी व इतर देयतेच्या रकमेत कमी 3% पर्यंत रोख व बँकेतील शिल्लक ठेवणे आवश्यक आहे. ह्या मर्यादा निश्चित करतांना शाखांमध्ये असलेल्या ठेवी, मुख्य कार्यालयापासून शाखेचे अंतर व अन्य बाबी विचारांत घेउन खालील प्रमाणे मुख्य कार्यालय व शाखांवर रोख ठेवण्याची मर्यादा निश्चित करण्यांत आली आहे.

(रुपये लाखांत)

| अ.क्र. | शाखा | एकुण ठेवी २६.६.२००२ | सध्याची मर्यादा | (+) वाढ/ (−) घट | नविन मर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | मुख्य कार्यालय | १२९६२.८७ | ८०३.१० | (−) ३९.१० | ७६४.०० |
| २. | महाल | २४०२.१४ | ७०.०० | | ७०.०० |
| ३. | हनुमाननगर | १०५७.६५ | २५.०० | | २५.०० |
| ४. | गांधीबाग | ६७१.०० | २५.०० | (−) ५.०० | २०.०० |
| ५. | जिल्हा परिषद | ४१००.५७ | ५०.०० | | ५०.०० |
| ६. | धंतोली | १४१२.७७ | २५.०० | | २५.०० |
| ७. | रामनगर | २७७५.२६ | २५.०० | | २५.०० |
| ८. | पांचपावली | ७०३.४२ | २०.०० | | २०.०० |
| ९. | धान्यगंज | ३३६.८८ | १०.०० | | १०.०० |
| १०. | कळमना बाजार | २०७५.१४ + २५.०० | ३०.०० | | ३०.०० |
| ११. | गणेशपेठ | ९४६.५३ | २०.०० | | २०.०० |
| १२. | जरीपटका | ९८२.११ | १०.०० | (−) ५.०० | ५.०० |
| १३. | कोराडी | ६३५.१५ | १६.०० | | १६.०० |

| १ | 2 | 3 | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १४. | खापरखेडा | ६८६.६४ | 20.00 | -- | 20.00 |
| १५. | कामठी | ६०७.५६ | १५.00 | -- | १५.00 |
| १६. | पांचगांव | 32९.७0 | ६.00 | -- | ६.00 |
| १७. | कन्हान | १११८.८५ | १६.00 | -- | १६.00 |
| १८. | गुमगांव | २२८.६0 | ६.00 | -- | ६.00 |
| १९. | हिंगणा | १०६९.५3 | २५.00 | -- | २५.00 |
| 20. | पेठ | ४20.९५ | ९.00 | -- | ९.00 |
| २१. | वाडी | १६3.0६ | 3.00 | -- | 3.00 |
| २२. | कळमेश्वर | १२४3.६७ | २५.00 | -- | २५.00 |
| 23. | विहिरगांव | १५९.६४ | ४.00 | -- | ४.00 |
| २४. | वडोदा | २४२.33 | ४.00 | -- | ४.00 |
| २५. | दिघोरी स्टेशन | १७0.८५ | २.00 | (+) १.00 | 3.00 |
| २६. | पाटणसावंगी | ६32.१९ | १५.00 | -- | १५.00 |
| २७. | सक्करदरा | ७3६.६७ | १0.00 | -- | १0.00 |
| २८ | बुटीबोरी | ९२४.७१ | 20.00 | -- | 20.00 |
| २९. | फेटरी | १६८.६८ | ४.00 | -- | ४.00 |
| 30. | जिंगाबाईचकली | १७0.६2 | ४.00 | -- | ४.00 |
| 3१. | हुडकेश्वर | ८७.00 | १.00 | (+) १.00 | २.00 |
| 32. | कुही | ६६0.८७ | १४.00 | (+) ४.00 | १८.00 |
| 33. | वेलतुर | ४९६.४८ | ६.00 | (+) 2.00 | ८.00 |
| 3४. | मौदा | २3९.९3 | ४.00 | (+) १.00 | ५.00 |
| 3५. | गोठणगाव | १११.८९ | २.00 | (+) १.00 | 3.00 |
| 3६ | कान्होलीबारा | १५४.५0 | ५.00 | (-) १.00 | ४.00 |
| 3७ | कवडस | ४४.२3 | १.00 | -- | १.00 |
| 3८. | टाकळघाट | १२६.९१ | २.५0 | (+) 0.५0 | 3.00 |
| 3९. | मोहगांव (झिल्पी) | १७९.९४ | ५.00 | -- | ५.00 |
| ४0. | आडेगांव | 33.१७ | १.00 | -- | १.00 |
| ४१ | रामटेक | ६3८.६८ | १५.00 | -- | १५.00 |
| ४२. | पवनी | १४७.९६ | ४.00 | -- | ४.00 |
| ४3. | नगरधन | ९0.3९ | २.00 | -- | २.00 |
| ४४ | देवलापार | ९3.७0 | २.00 | -- | २.00 |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ४५. | मनसर | ११२.०८ | ५.०० | -- | ५.०० |
| ४६. | पारशिवनी | ७४८.४३ | २३.०० | (−) १.०० | २२.०० |
| ४७. | नवेगांव(खैरी) | ९८.७८ | १.५० | (+) ०.५० | २.०० |
| ४८. | मौदा | ६७०.८२ | १५.०० | (+) ५.०० | २०.०० |
| ४९. | तारसा | १८६.६५ | ४.०० | -- | ४.०० |
| ५०. | अरोली | १५१.३८ | ३.०० | -- | ३.०० |
| ५१. | खात | १५१.८८ | ३.५० | (+) ०.५० | ४.०० |
| ५२. | धानला | १४५.०७ | ३.०० | (+) १.०० | ४.०० |
| ५३. | मारोडी | २०६.०२ | ५.०० | -- | ५.०० |
| ५४. | खेराक | १०५.७१ | २.०० | (+) १.०० | ३.०० |
| ५५. | गोवरी | १३८.०७ | ३.०० | -- | ३.०० |
| ५६. | काटोल | ८०४.४४ | २०.०० | (+) ४.०० | २४.०० |
| ५७. | कोंढाळी | ४८८.४२ | १५.०० | -- | १५.०० |
| ५८. | रिधोरा | ५५३.६६ | ६.०० | -- | ६.०० |
| ५९. | येनवा | १७५.६० | ३.०० | (+) १.०० | ४.०० |
| ६०. | पारडसिंगा | ३३७.५० | ८.०० | -- | ८.०० |
| ६१. | मेटपांजरा | १५२.२२ | ३.०० | (+) १.०० | ४.०० |
| ६२. | नरखेड | ४९२.०८ | १५.०० | -- | १५.०० |
| ६३. | मोवाड | १९९.२० | ४.०० | -- | ४.०० |
| ६४. | सावरगांव | ३५०.०६ | ७.५० | (+) ०.५० | ८.०० |
| ६५. | जलालखेडा | ४१८.९७ | १०.०० | -- | १०.०० |
| ६६. | पिपळाकेवलराम | ११६.९९ | २.०० | (+) १.०० | ३.०० |
| ६७. | लोहारीसावंगा | १०४.९९ | २.०० | (+) १.०० | ३.०० |
| ६८. | थडीपवनी | ११८.७८ | २.५० | (+) ०.५० | ३.०० |
| ६९. | बेलोना | ११०.७४ | २.४० | (+) ०.६० | ३.०० |
| ७०. | मेंढला | ९४.४० | २.०० | -- | २.०० |
| ७१. | सावनेर | १२७०.९३ | ३०.०० | -- | ३०.०० |
| ७२. | नांदागोमुख | २०४.५३ | ५.०० | -- | ५.०० |
| ७३. | खापा | ६२७.३१ | १५.०० | -- | १५.०० |
| ७४. | बडेगांव | ९२.७५ | २.०० | -- | २.०० |
| ७५. | केळवद | ३६७.७५ | ८.०० | -- | ८.०० |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ७६. | मोहपा | ३३९.४४ | ७.०० | -- | ७.०० |
| ७७. | धापेवाडा | २४७.८५ | ६.०० | -- | ६.०० |
| ७८. | कोंढळी | २०४.४९ | ५.०० | (+) १.०० | ६.०० |
| ७९. | उमरेड | ९४२.६८ | २०.०० | -- | २०.०० |
| ८०. | सीर्सी | २४०.७७ | ७.०० | -- | ७.०० |
| ८१. | बेला | ५८५.१४ | १५.०० | -- | १५.०० |
| ८२. | मकरधोकडा | ~~१९२.१३~~ | ३.०० | (+) १.०० | ४.०० |
| ८३. | ब्राम्हणी | ६९.४३ | १.५० | (+) ०.५० | २.०० |
| ८४. | शेडेश्वर | १३६.९३ | ३.०० | -- | ३.०० |
| ८५. | भिवापूर | ३५२.९६ | १०.०० | -- | १०.०० |
| ८६. | नांद | १३३.४४ | ३.०० | -- | ३.०० |
| ८७. | बेसुर | ९७.९६ | २.०० | -- | २.०० |
| ८८. | जवळी | ७५.९८ | १.५० | (+) ०.५० | २.०० |
| ८९. | चापेर | ४१.२० | १.०० | -- | १.०० |
| ९०. | मुर्ती | २९.७७ | -- | (+) १.०० | १.०० |
| | एकुण | ५५९४०.६२ | १६९७.०० | (-) १९.०० | १६७७.०० |

## प्रशासकीय ठराव मंजुर

विषय क्रमांक ६ : व्यवसाय कर्ज योजने अंतर्गत आलेल्या कर्ज मर्यादा नुतनीकरण मागणी अर्जाबाबत.

ठराव क्रमांक ६ : व्यवसाय कर्ज योजनेअंतर्गत आलेल्या कर्जमर्यादा नुतनीकरण मागणी अर्जावर निर्णय होउन प्रकरणामध्ये मागिल वर्षासाठी मंजुर असलेल्या कर्ज मर्यादांचे कार्यालयीन टिपणीनुसार खालिल प्रमाणे नुतनीकरण मंजुर करण्यांत आले.

| अ. क्र. | व्यवसायीकाचे नांव | मागिल वर्षीची मंजुर मर्यादा | कर्जाचा प्रकार | नुतनिकरण मंजुर मर्यादा | मुदत. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | श्री. संजय नागोराव अभिकारे | रु. ५.०० लाख | क्लीन कॅश क्रेडीट | रुपये ५.०० लाख | 31.7.2003 |
| २ | श्री शाम बालचंद बादुले | रु. १.०० लाख | नजर गहाण | रुपये १.०० लाख | 31.7.2003 |
| 3. | श्री. अनंतराव नारायण घारड | रु. २०.०० लाख | क्लिन कॅश क्रे | रु. २०.०० लाख | 30.8.2003 |

कर्ज मंजुरीच्या विशेष अटी :-

१) वरील क्र.१, २ व ३ कडून अनुक्रमे रुपये ५०,०००/-, रुपये १०,०००/- व रुपये २०००००/- ची मुदती ठेव घेऊनच कर्ज खात्यावर उचल द्यावी.

२) वरील क्र.२ चे कर्ज खात्यावरील व्यवहार वाढविण्यास कळवावे.

वरील प्रमाणे प्रशासकीय ठराव मंजूर

---

(एस.एस. गोडे)
प्रभारी व्यवस्थापक

(एल.बी. पाटिल)
प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि. नागपूर.